




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

सोमवार, दि. १७ नोव्हेंबर २०२५








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४ थे | अंक : ००७ | किंमत : ४.०० रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# 20 टक्क्यांचा कोटा टाळण्यासाठी लबाडी; घरे द्यावी लागू नये यासाठी भूखंडांचे विभाजन

## चौकशीत ४९ विकासकांवर ठपका

मुंबई : (समर्थ गांवकरी)

राज्य सरकारच्या सर्वसमावेशक योजनेअंतर्गत प्रत्येक गृहप्रकल्पातून २० टक्के घरे दुर्बल घटकांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. मात्र, नाशिकमधील ४९ विकासकांनी या योजनेतून गृहप्रकल्प वगळण्यासाठी भूखंडांचे विभाजन केल्याचे कागदोपत्री दाखवल्याचे उघड झाले आहे. नाशिक जिल्हाधिकाऱ्यांच्या चौकशी अहवालातच या विकासकांवर ठपका ठेवण्यात आला आहे. हा अहवाल आता राज्य सरकारकडे सादर करण्यात आला आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील नागरिकांना परवडणाऱ्या किमतीत घरे उपलब्ध व्हावीत, यासाठी राज्य सरकारने २०१३मध्ये २० टक्के सर्वसमावेशक योजना लागू केली. या योजनेनुसार मुंबईवगळता दहा लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या महापालिका क्षेत्रातील चार हजार चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्रफळावरील गृहप्रकल्पांमध्ये २० टक्के घरे दुर्बल घटकांसाठी बांधून ती म्हाडाकडे हस्तांतरित करावी लागतात. मात्र, राज्यभरातील अनेक विकासक या योजनेतून पळवाटा काढत असल्याचे दिसून आले आहे. नाशिकमध्ये विकासकांकडून घरे मिळत नसल्याने म्हाडाने नाशिक जिल्हाधिकारी आणि महानगरपालिकेकडे पाठपुरावा सुरू केला होता. त्यावेळी यात गैरप्रकार सुरू असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने चौकशीचे आदेश दिले होते. हा चौकशी अहवाल आता राज्य सरकारकडे सादर करण्यात आला आहे.



अहवालानुसार २० टक्के योजना लागू होऊ नये यासाठी एकूण १०८ विकासकांनी भूखंडांचे विभाजन केले. यातील ७१ विकासकांनी अधिकृतपणे भूखंडाचे विभाजन केले असले तरी विभाजनामुळे २० टक्के योजना लागू न झाल्याने गरीबांना घरापासून वंचित ठेवले. तर ४९ विकासकांनी भूखंड विभाजनातही गैरप्रकार केला. बनावट भूखंड विभाजनामुळे म्हाडाला १ लाख ९३ हजार ३४८ चौ.मीटर इतक्या क्षेत्रावरील घरे गमवावी लागली आहेत. तर या घरांचे बाजारमूल्य १५९.३३ कोटी रुपये असल्याचेही अहवालात नमूद आहे.

म्हाडाकडून सातत्याने विकासकांकडे पाठपुरावा करून देखील नाशिकमध्ये केवळ १५०० घरे उपलब्ध झाली. या योजनेत गृहप्रकल्पाचा समावेश होऊ नये, यासाठी विकासक भूखंडांचे विभाजन केल्याचे दाखवत असल्याचे समोर आले. याबाबत म्हाडाच्या मागणीनंतर नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयाने ३० सप्टेंबर २०२४ रोजी सात सदस्यीय चौकशी समिती नेमली होती. या समितीचा अहवाल नुकताच जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर झाला आहे.

नियमानुसार जमीन मालक वा विकासकाने उपअधीक्षक भूमी अभिलेख किंवा नगर भूमापन विभागाकडे अर्ज केल्यास संबंधित भूखंडाची आणि लगतच्या इतर भूखंडाची माहिती तपासत मोजणीची नोटीस जारी केली जाते. त्यावर सूचना-हरकती मागविल्या जातात. सूचना-हरकतीची दखल घेत त्यानंतर अंतिम नकाशा तयार करून, त्यावर संबंधित अधिकाऱ्यांच्या सह्या घेऊन पोटहिस्सा नकाशा तहसीलदाराकडे पोस्टाने किंवा प्रत्यक्ष जाऊन दिला जातो. त्यानंतर सातबारा फोड करून नवीन सातबारा तयार करून गृहप्रकल्पाचा प्रस्ताव पालिकेकडे बांधकाम मंजुरीसाठी पाठवाला जातो. असे असताना ४९ प्रकरणामध्ये ही कोणतीही प्रक्रिया न करता बनावट पोटहिस्सा नकाशा तयार करत, बनावट सात बारा तयार करून बेकायदा भूखंड विभाजन करण्यात आले. तसेच त्याआधारे पालिकेकडे बांधकाम मंजुरीसाठी प्रस्ताव पाठवण्यात आले.

## डॉ. कंबरतोड हड्डीवाले






## शक्तिप्रदर्शन करत सांगलीत उमेदवारी अर्ज दाखल...

सांगली : (समर्थ गांवकरी)

उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी अवघे २४ तास उरले असताना रविवारी अनेक उमेदवारांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करत रविवारी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. उमेदवारी दाखल करण्याची मुदत सोमवारी दुपारी समाप्त होणार असतानाही महायुती व महाविकास आघाडीच्या अंतिम उमेदवार अनिश्चित असल्याने अखेरच्या दिवशी उमेदवारी दाखल करण्यासाठी झुंबड उडणार आहे.


## छतावरून पळणाऱ्या गुंडाने पिस्तूल रोखताच गोळी झाडून केले जखमी

### कमरेत लागली गोळी, जखमी अवस्थेत रुग्णालयात

नांदेड : (समर्थ गांवकरी)

कुख्यात गुन्हेगार रबज्योत सिंह ऊर्फ गब्या याला पोलिसांनी शनिवारी मध्यरात्री १२.३० वाजता अटक केली. संशयित रबज्योत सिंह हा भगतसिंह रस्त्यावरील निधानसिंह कॉलनीतील आपल्या घरी असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यामुळे शनिवारी मध्यरात्री पोलिसांनी त्याच्या घराला वेढा घातला. पोलिसांना पाहून संशयित लपण्यासाठी छतावर पळाला. पोलिसांनी छतावर चढून त्याला शरण येण्याचा इशारा दिला. त्यानंतर त्याने पोलिसांवर पिस्तूल रोखले. त्यामुळे पोलिसांनी बचावासाठी त्याच्यावर गोळी झाडली. कमरेला गोळी लागल्यानंतर जखमी अवस्थेत पोलिसांनी ताब्यात घेऊन संशयिताला विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

वजिराबाद पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाला गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार गब्याला अटक करण्यासाठी मध्यरात्री १२.३० वाजता पोलिसांचे पथक गेले होते.



पथकाला पाहून गब्याने छतावर धाव घेतली. पोलिसांनी त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याने पोलिसांवरच पिस्तूल रोखून पळ काढण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पोलिस अंमलदार गणेश धुमाळ यांनी बचावात्मक कारवाई करत त्याच्या दिशेने गोळीबार केला. पोलिसांनी त्याच्या पायाच्या दिशेने गोळी झाडली होती. मात्र बचावासाठी गब्या खाली वाकल्याने गोळी त्याच्या कमरेजवळ लागली. त्याच्यावर विष्णुपुरी येथील रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या घटनेनंतर अंमलदार धुमाळ यांनी दिलेल्या तक्रारीवरून इतवारा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक भारती करत आहेत. गब्यावर खंडणी वसुलीसह विविध गंभीर गुन्हा दाखल आहेत.

## चाकणमध्ये उद्धव ठाकरे- एकनाथ शिंदे एकत्र

### स्थानिक निवडणुकीत अनपेक्षित राजकीय चित्र



मुंबई : (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रात शिवसेना फुटल्यानंतर उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यातील मतभेद अनेकदा उघडपणे दिसून आले. दोन्ही बाजूंनी स्वतंत्र भूमिका घेत राज्यभर संघर्षात्मक वातावरण तयार झाले होते. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तयारीदरम्यान चाकणमध्ये मात्र अगदी अनपेक्षित घडामोड घडली आहे. येथे दोन्ही गटातील नेते एका उमेदवाराच्या मागे एकत्र उभे राहिल्याने संपूर्ण राज्यात चर्चा रंगली आहे. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदासाठी शिंदे गटाच्या मनिषा गोरे यांनी अर्ज भरताना, ठाकरे गटाचे आमदार बाबाजी काळे आणि शिंदे गटाचे आमदार शरद सोनवणे दोघेही उपस्थित होते. त्यामुळे शिवसेनेच्या दोन्ही गटांनी स्थानिक पातळीवर केलेल्या सहकार्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

या निर्णयामागील कारणाबाबत बोलताना आमदार बाबाजी काळे यांनी स्पष्ट केले की, दिवंगत आमदार सुरेश गोरे यांच्या निधनानंतर ही पहिली मोठी निवडणूक होत आहे. त्यांच्या कार्याचा आणि योगदानाचा आदर म्हणून त्यांच्या पत्नी मनिषा गोरे यांना पाठिंबा दिला गेला आहे. काळे यांच्या म्हणण्यानुसार हा पाठिंबा केवळ भावनिक आणि स्थानिक श्रद्धेचा भाग आहे, त्याला राजकीय युती समजू नये. उद्धव ठाकरे आणि संपर्क प्रमुख सचिन अहिर यांनीही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये निर्णय स्थानिक कार्यकर्त्यांनी घ्यावा, अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत. त्यामुळे हा निर्णय चाकणपुरताच मर्यादित असून तालुक्यातील इतर ठिकाणी दोन्ही गट स्वतंत्रपणे स्पर्धेत उतरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### ही केवळ एक अपवादात्मक घटना?

एका बाजूला चाकणसारख्या ठिकाणी स्थानिक भावनिक कारणास्तव दोन्ही गट एकत्र येतात, तर दुसऱ्या बाजूला मुंबईत शिंदे गटात स्वतःच्या ताकदीचा संतुलित वापर करण्याबाबत कठोर संदेश दिला जातो, हे चित्र महाराष्ट्राच्या राजकारणातील गुंतागुंतीची झलक दाखवते. चाकणमधील सहकार्य ही केवळ एक अपवादात्मक घटना असल्याचे दोन्ही बाजू सांगत असल्या तरी त्यातून स्थानिक पातळीवर राजकीय लवचिकतेला किती महत्व दिले जात आहे, हे दिसून येते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि मुंबई महानगरपालिका निवडणुकीत या हालचालींचा काय परिणाम होतो, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.



## पंतप्रधान मोदी यांचे आज 'गोएंका स्मृती' व्याख्यान

नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)

'सत्यकथन, उत्तरदायित्व आणि वैचारिकता यांची बांधिलकी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'रामनाथ गोएंका लेक्चर' मध्ये सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी आपले विचार मांडणार आहेत. नवी दिल्लीत निमंत्रितांच्या उपस्थितीत हे व्याख्यान होईल. यंदा या व्याखानाचे यंदा सहावे वर्ष आहे.

## महानगर गॅसच्या पाईपलाईनमध्ये बिघाड; सीएनजी पुरवठा प्रभावित

मुंबई : (समर्थ गांवकरी)

महानगर गॅसच्या पाईपलाईन मध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने मुंबईतील सीएनजीचा पुरवठा बाधीत झाला आहे. त्याचा फटका ठाणे आणि नवी मुंबईतील सीएनजी पंपानादेखील बसण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. मात्र नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी घरोघरी होणारा पाईप गॅस पुरवठा सुरू राहणार असल्याचे महागनर गॅसने स्पष्ट केले आहे. मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात महानगर गॅस लिमिटेडकडून गॅसचा पुरवठा केला जातो. आरसीएफ कंपाऊंडमधील गेलच्या मुख्य गॅस पाइपलाईनमध्ये बिघाड झाल्याने वडाळा येथील महानगर गॅसच्या सिटी गेट स्टेशनला (सीजीएस) होणारा गॅस पुरवठा प्रभावित झाला आहे. याचा फटका मुंबई, ठाण्यातील गॅस पुरवठ्यावर बसला आहे. रविवारी महानगर गॅस लिमिटेडने तांत्रिक बिघाडामुळे गॅस पुरवठा बाधीत झाल्याचे सांगितले. मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई परिसरातील बहुतांश ऑटो-रिक्शा आणि टॅक्सी तसेच सार्वजनिक वाहतूक उपक्रमांच्या बसेस महानगर गॅस पुरवठा करत असलेल्या सीएनजीवर चालतात. पण महानगर गॅसच्या सिटी गेट स्टेशनला वायू पुरवठा खंडित आल्याने मुंबईतील अनेक गॅस पंपावर सीएनजीचा तुटवडा निर्माण झाला आहे. या बिघाडामुळे मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईतील सीएनजी पंपदेखील बंद पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. महानगर गॅस लिमिटेड आपल्या घरगुती (पीएनजी) ग्राहकांना प्राधान्याने गॅस पुरवठा करत असतो. दरम्यान, बिघाड झाला असला तरी घरगुती गॅस ग्राहकांना कोणत्याही अडचणीशिवाय गॅस पुरवठा करण्यात येईल, असे महानगर गॅस लिमिटेडकडून सांगण्यात येत आहे. पाइपलाइनमध्ये नेमका काय बिघाड झाला आणि तो दुरूस्त होण्यासाठी किती वेळ लागेल याबाबत कंपनीने कोणतीही माहिती दिलेली नाही. या बिघाडामुळे पर्यायी इंधन वापरण्याचा सल्ला महानगर गॅस लिमिटेडने दिला आहे.

### पुढील आठवडाभर हुडीहुडी कायम राहणार

## राज्यात थंडीचा कडाका वाढला; धुळ्यात ८, महाबळेश्वरमध्ये १०.२ डिग्री तापमान



मुंबई : (समर्थ गांवकरी)

संपूर्ण राज्यात सध्या थंडीचा कडाका चांगलाच वाढला असून बहुतांश भागांत किमान तापमानात लक्षणीय घट होण्यास सुरुवात झाली आहे. जवळजवळ सर्वच जिल्ह्यांमध्ये थंडीची लाट पसरल्याचे चित्र असून नागरिक ठिकठिकाणी शेकोट्यांचा आधार घेत आहेत. मुंबई, पुणे, कोकण, मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात पुढील आठवडाभर थंडीची तीव्रता कायम राहील, असा इशारा हवामान विभागाने दिला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्याच्या उत्तरेकडील भागांपासून मराठवाड्यापर्यंत काही दिवसांत तापमानात लक्षणीय घट होणार आहे. त्यामुळे थंडीचा कडाका आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

# अमित ठाकरे यांच्यावर राजकीय प्रवासातील पहिला गुन्हा

### नेरूळमध्ये परवानगीशिवाय शिवरायांच्या पुतळ्याचे अनावरण

मुंबई : (समर्थ गांवकरी)

नवी मुंबईतील नेरूळ परिसरात चार महिन्यांपासून झाकून ठेवलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे मनसेचे नेते अमित ठाकरे यांनी परवानगी न घेता अनावरण केल्यानंतर या प्रकरणाने मोठा राजकीय रंग घेतला आहे. स्थानिक पोलिसांनी या घटनेची नोंद घेत अमित ठाकरे आणि त्यांच्या सोबत उपस्थित असलेल्या सुमारे 70 मनसैनिकांवर गुन्हा दाखल केला आहे. विशेष म्हणजे, अमित ठाकरे यांच्या राजकीय प्रवासातील हा पहिलाच गुन्हा असून त्यामुळे या कारवाईकडे राज्यभरातून लक्ष लागले आहे.

नेरूळमधील राजीव गांधी उड्डाणपुलाजवळ उभारलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा गेल्या चार महिन्यांपासून अनावरणाशिवाय तसाच कापडाने झाकलेला होता. नागरिकांकडून या संदर्भात तक्रारी येत असतानाही अधिकृत अनावरणासाठी कोणत्याही मंत्री किंवा पदाधिकाऱ्याला वेळ न मिळाल्याचा स्थानिकांचा आरोप होता. ही बाब अमित ठाकरेंना कळताच त्यांनी कोणतीही परवानगी न घेता मनसैनिकांच्या उपस्थितीत पुतळ्यावरील कापड हटवून अनावरण पूर्ण केले. या वेळी पोलिसांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केल्याने दोन्ही बाजूंमध्ये ढकलाढकलीही झाली.



शिवाजी महाराजांचा पुतळा गेल्या चार महिन्यांपासून अनावरणाशिवाय

अमित ठाकरे यांनी केलेले अनावरण हा अचानक घेतलेला निर्णय नसल्याचे त्यांच्या भाषणातून दिसून आले. ते कौपरखैरणे येथे मनसे शाखेच्या उद्घाटनासाठी आले असताना काही कार्यकर्त्यांनी पुतळा धूळ खात पडल्याची माहिती दिली. त्यांनी तात्काळ त्या ठिकाणी जाऊन परिस्थिती पाहिली आणि चार महिने पुतळा झाकून का ठेवला आहे, याबाबत प्रश्न उपस्थित केला. महाराजांची मूर्ती लोकांच्या मागणीनुसार उभारली. पण चार महिने कोणीच अनावरणासाठी आला नाही. इतक्या काळ पुतळ्यावर धूळ साचत आहे, हे बघवेना म्हणून अनावरण केलं, असे ठाकरे म्हणाले.

या प्रसंगी त्यांनी सरकारवर जोरदार टीका करत राज्यातील प्रमुख नेते आणि मंत्र्यांनी नवी मुंबईत अनेक कार्यक्रमांसाठी हजेरी लावली तरी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत मात्र दुर्लक्ष झाले, असा आरोप केला.

पंतप्रधानांपासून मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री सगळेच इथे आले. पण आपल्या आराध्य दैवतांच्या पुतळ्याला कापडात ठेवून देतात, हे नवी मुंबईतील लोकांना मान्य नव्हतं, असे ते म्हणाले. अनावरण करताना मनसे कार्यकर्त्यांनीही घोषणाबाजी करत या दुर्लक्षाचा निषेध व्यक्त केला.

या सर्व प्रकाराचा व्हिडिओ आणि माहिती सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी कारवाईची पावले उचलली. परवानगीशिवाय केलेल्या सार्वजनिक कार्यक्रमामुळे पोलिस अधिनियम आणि संबंधित कलमांनुसार गुन्ह्याची नोंद करण्यात आली. या संदर्भात प्रतिक्रिया देताना अमित ठाकरे यांनी, ही माझ्या आयुष्यातील पहिली केस असेल तर त्याचा आम्हाला अभिमानच आहे. महाराजांसाठी शेकडो केसेस लागल्या तरी त्याची आम्ही पर्वा करणार नाही, असा ठाम पवित्रा घेतला. या घटनेनंतर मनसे कार्यकर्त्यांचा उत्साह वाढल्याचे पाहायला मिळत असून पुढील काही दिवसांत हा मुद्दा आणखी तापण्याची चिन्हे आहेत.

# निष्काळजीपणाचा स्फोट



## संपादकीय

श्रीनगर नौगाम स्फोटात ९ जण ठार, तर ३२ जण जखमी झाले. लाल किल्ल्याच्या समोर झालेल्या बॉम्बस्फोटाच्या बरोबर पाचव्या दिवशी हा स्फोट झाला. केंद्रीय गृहमंत्रालयाच्या संयुक्त सचिव आणि जम्मू काश्मीर पोलिसांच्या पोलीस महासंचालकांनी या स्फोटाला अपघाती म्हटले असले तरीही हा स्फोट भारताच्या अंतर्गत सुरक्षेला असलेला धोका म्हणून समोर आला आहे हे निश्चित. गृह मंत्रालयाने हा दहशतवादी हल्ला नाही असे म्हटले असले तरीही सुरक्षाकर्मी कसे निष्काळजीपणे वागून आपले आणि इतरांचेही जीव धोक्यात घालतात असे या घटनेवरून लक्षात आले आहे. स्फोट इतका भीषण होता की, त्या स्फोटाचा आवाज एक किलोमीटरपेक्षाही जास्त अंतरावर ऐकू आला. पण या घटनेनंतर आता अनेक बाबी समोर आल्या आहेत. फरिदाबाद येथे स्फोटके मिळतात. उरलेल्या दहशतवाद्याच्या साथीदारांना शोधण्याचे काम सुरू ठेवले असते, तर लाल किल्ल्याच्या जवळ झालेल्या स्फोटात अनेकांचा जीव गेला नसता आणि त्यानंतर हा नौगाम स्फोटाची घटना घडली नसती. हा स्फोट जरी अधिकारी स्तरावरून अपघाती म्हटला गेला असला तरीही तो तसा नव्हता. कारण त्यात सुरक्षाकर्मींची बेपर्वाई आणि ढिसाळपणा कारण होता हे यातून स्पष्ट झाले आहे. मुळात फरिदाबादमध्ये सापडलेली स्फोटके काश्मीरमध्ये नेण्याची काहीच गरज नव्हती. फरिदाबादमध्येच ती निकामी करण्यात आली असती, तर ९ जणांचे जीव गेले असते ते गेले नसते. फरिदाबाद येथे सापडलेल्या स्फोटकांची हाताळणी करताना स्फोट झाला असे पोलिसांचे म्हणणे आहे. याचा अर्थ पोलिसांना स्फोटके कशी हाताळायची याचे प्रशिक्षण नव्हते का, असा प्रश्न उपस्थित होतो. आता नौगाम येथील स्फोट स्थळ माध्यमांचे आकर्षण केंद्र झाले आहे. नौगाम स्फोट ही अलीकडच्या काळात पोलीस ठाण्यात झालेल्या सर्वात विनाशकारी स्फोटांपैकी एक आहे असे बोलले जाते. केवळ जीव गमावले, कुटुंबे उद्ध्वस्त झाली आणि घरांचे नुकसान झाले एवढ्यापुरती ही गोष्ट थांबणारी नाही, तर वेदनादायक बाब म्हणजे दहशतवादी तपासादरम्यान घडलेली ही घटना आहे. एका व्हाईट कॉलर मोड्यूलचा शोध लावण्यात पोलिसांना यश आले आणि तो आनंद फार काळ टिकला नाही, तर तपासादरम्यान हा स्फोट होऊन नऊ जणांचा जीव गेला आहे. स्थानिक अधिकाऱ्यांच्या समर्पण आणि दृढ निश्चयामुळे एक मोठा दहशतवादी कट उधळून लावण्यात आला पण फरिदाबाद स्फोटकांच्या तपासातून मिळवलेले ज्वलनशील पदार्थांच्या बाबतीत जी अक्षम्य ढिलाई आणि निष्काळजीपणा केला गेला त्यामुळे या कष्टसाध्य यशावर पाणी पडले आहे. डीजीपींनी या प्रकारात दहशतवादाची शक्यता फेटाळून लावली आहे आणि त्यामुळे हा दिलासा असला आणि अफवांना पसरू दिले नाही, तरीही अवघड प्रश्न ते लपवू शकलेले नाही.



## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ३८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | 7 | | 5 | | | | 2 |
| | 2 | 1 | 4 | 9 | | | 3 | |
| | | 4 | | 8 | | | | |
| | 5 | | 8 | 1 | | | | 9 |
| 3 | 7 | 6 | | | | 2 | 1 | 8 |
| 1 | | | | 2 | 3 | | 6 | |
| | | | | 6 | | 9 | | |
| | 8 | | | 3 | 9 | 1 | 4 | |
| 2 | | | | 7 | | 6 | 8 | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे. या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ३७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 3 | 7 | 6 | 5 | 1 | 4 | 9 | 2 |
| 5 | 2 | 1 | 4 | 9 | 7 | 8 | 3 | 6 |
| 9 | 6 | 4 | 3 | 8 | 2 | 7 | 5 | 1 |
| 4 | 5 | 2 | 8 | 1 | 6 | 3 | 7 | 9 |
| 3 | 7 | 6 | 9 | 4 | 5 | 2 | 1 | 8 |
| 1 | 9 | 8 | 7 | 2 | 3 | 5 | 6 | 4 |
| 7 | 4 | 3 | 1 | 6 | 8 | 9 | 2 | 5 |
| 6 | 8 | 5 | 2 | 3 | 9 | 1 | 4 | 7 |
| 2 | 1 | 9 | 5 | 7 | 4 | 6 | 8 | 3 |

विक्रम संवत्- २०८२
कार्तिक शके
संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- दक्षिणायान
मास- कार्तिक

ऋतु- सौर हेमंत
कृष्ण पक्ष
तिथि:त्रयोदशी
(अहोरात्र)
नक्षत्र:चित्रा २९:०१:२१+
योग:प्रीति ०७:२२:२३

करण:गर १७:५८:५०
करण:वणिज (अहोरात्र)
सूर्य:वृश्चिक
चन्द्र:तुला१५:३४:४६
हिजरी सन् - १४४६
मुस्लिम मास -

## उपदेशाचे डोस

### भगवान

एका फकिराला एकदा स्वप्न पडले. स्वप्नात तो स्वर्गात गेला. तेथे रस्त्यावर मोठी गर्दी झालेली त्याला दिसली. त्या गर्दीतील एकाला त्याने विचारले, एवढे लोक का जमले आहेत? त्या व्यक्तीने सांगितले, आज भगवानांचा जन्मदिन आहे. ते येथून जाणार आहेत. फकिराला आपल्या भाग्याचा हेवा वाटला. साक्षात भगवानाचे दर्शन घडणार. थोड्या वेळाने एका उमद्या घोड्यावरुन एक राजबिंडा तरुण आला. त्याच्यामागे हजारो लोक होते. त्याला पाहून फकिराने विचारले, हेच का ते भगवान? ती व्यक्ती म्हणाली, नाही हे भगवान नाहीत. हे राम आहेत. त्यांना मानणारे लोक त्यांच्यामागून जात आहेत... याच पद्धतीने येशू, बुद्ध, महावीर... सर्वजण येऊन गेले. भगवानांची वाट पाहता पाहता मध्यरात्र झाली. सारे लोक कंटाळून निघून गेले. आणि त्या निर्मनुष्य रस्त्यावरुन एक म्हातारा एकटाच आला. फकिराने त्याला विचारले, आपणच भगवान? म्हातारा म्हणाला, हो. फकिराने विचारले, मग आपल्यामागून कोणीच कसे येत नाही? डोळ्यात अश्रू आणत तो म्हातारा म्हणाला, सारे राम, महावीर, बुद्ध, येशूबरोबर गेले. जो कोणाबरोबर जात नाही, तोच माझ्याबरोबर येऊ शकतो.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९१४ - पनामा कालव्यातून पहिले जहाज नेऊन पनामा कालव्यातून दळणवळण सुरू करण्यात आले.
- २००६ - भारत-अमेरिकेदरम्यान झालेल्या नागरी अणुकराराला अमेरिकन सिनेटने प्रचंड बहुमताने मान्यता दिली.

### राष्ट्रीय

- १७१३ - बाळाजी विश्वनाथास पेशवेपद मिळाले.
- १८१७ - पुण्यातील शनिवारवाड्यावरील मराठेशाहीचा ध्वज खाली येऊन इंग्रजांना युनियन जॅक फडकविण्यात आला.


### जन्म

- १५०२ - अताहुआल्पा, शेवटचा इंका सम्राट.
- १७५५ - लुई अठरावा, फ्रांसचा राजा.
- १७९० - ऑगस्ट फर्डिनांड मोबियस, जर्मन गणितज्ञ.
- १८८३ - हॅरोल्ड बॉमगार्टनर, दक्षिण आफ्रिकेचा क्रिकेट खेळाडू.
- १९०५ - ऍस्ट्रीड, बेल्जियमची राणी.
- १९०५ - आर्थर चिप्परफील्ड, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १९२३ - बर्ट सटक्लिफ, न्यू झीलँडचा क्रिकेट खेळाडू.

### निधन

- ३७५ - व्हॅलेन्टिनियन पहिला, रोमन सम्राट.
- ५९४ - तूर्सचा ग्रेगरी, इतिहासकार.
- ६४१ - जोमेइ, जपानी सम्राट.
- १५५८ - मेरी पहिली, ईंग्लंडची राणी.
- १५९२ - योहान तिसरा, स्वीडनचा राजा.
- १७६८ - थॉमस पेलहाम-होल्स, युनायटेड किंग्डमचा पंतप्रधान.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ३८



### आडवे शब्द

१. निकट, सुमारे
४. शरीरातील वाताचे शमन करणारे उदा. सुंठ, ओवा, हिंग
८. वातावरणशुद्धी करणारा आरतीच्या तबकातील पदार्थ
१०. लग्नानंतर सुरुवातीच्या काळात दोघांचाच संसार यांच्यासारखा वाटतो
१२. मोठ्या मिनतवारीने घोड्यावर स्वार होणारा
१४. श्रीयुत
१७. बरोबर
१८. रशिया (हिंदी)
१९. पृथ्वी
२१. डाळीचे कालवण
२२. शिजवून बराच काळ झालेला पदार्थ
२३. कथन, सांगणे
२५. पाऱ्यापासून बनवलेले
२६. ही 'वरची' असेल तर बहुदा अवैध
२७. घेरी, चक्कर
२८. याच्यावरचे श्राद्ध म्हणजे नुसते काम उरकणे!
२९. बारीक नक्षीकाम
३०. मदतनीस
३२. तिथे (सं.)
३३. याच्या वाटेवर 'कुचूकुचू काटे'
३५. 'चायनीज' प्रमाणे आजकाल हे भोजनही 'फॅशन' मध्ये!
३६. आरोप
३७. कंटाळवाणी बडबड
३९. जोडीतील एक चर्मवाद्य
४१. धाक
४२. प्रामाणिक
४६. अनिश्चिततेमुळे भीती
४८. सैरभैर
५०. थोर, लोकोत्तर पुरुष
५३. भीती, दरारा
५४. हिंदीत विचार
५५. राकट, रांगडा
५७. खिचडी
५८. हाताला धरून 'पायी पायी'
६०. दरवाजाची झाप
६१. बोटावरील 'आरोग्याचा आरसा'
६३. अभंग रचताना संत तुकारामांनी 'मी तो --- भारवाही' अशी नम्र भूमिका घेतली
६६. चहापाणी इ.
६८. दीपोत्सव
६९. खानेसुमारी
७३. खोडणारे
७४. अडत्या
७५. विधानसभेतील लोकप्रतिनिधी
७६. डोळ्यात तेल घालून सांभाळ
७७. दर्पण
७८. मोठा हातोडा
७९. मोजकेपणा, मितता

### उभे शब्द

१. '--- उरी होते ज्यांच्या तेच गीत गाती' (अरूण दाते)
२. तेच ते वाचन
३. शिक्षा
४. किराणा व्यापारी
५. युद्धातील घोषणा
६. विपत्तीची कहाणी
७. सार्वजनिक उत्सवात
८. संध्याकाळ
९. फडतूस, भिकार
११. हा 'युवराज' असतोच असे नाही
१३. '--- आहे रात्र अजुनी, राजसा निजलास का'
१५. अधाशी
१६. राजकारणातील यादव, पवार यांचे नाव
१७. रक्ताचे नाते असलेला
२०. हाळी
२३. नोकरी असो की छोकरी ही महत्त्वाची!
२४. आकाशातील सत्तावीस तारकासमूह
२५. तारतम्य
२६. व्यायाम
२९. बाळाची निजण्याची जागा
३१. वपुंनी रंगमंचावर लोकप्रिय केलेला प्रयोग
३२. बूड
३३. फणसाची वा आंब्याची पोळी
३४. विद्या
३६. येणे-जाणे (मालाचे)
३८. तळे
४०. शेळी
४२. सरळमार्गी
४३. ताबा, वर्चस्व
४४. झकास
४५. सगळ्यात छोटा साप
४७. दृष्टीभेट
४८. वहीवाट, जाणे-येणे
४९. पुष्ट, जोमदार
५१. चलनवलन
५२. वाजतगाजत
५६. समर्थांच्या व्याख्येनुसार विनोद आवडणारा
५९. इनामी जमीन मिळालेला
६२. कटकारस्थान
६४. बागवान
६५. जीव
६७. पल्याड
६८. आश्वासन
६९. बस्तान
७०. नड
७१. अपेक्षाभंगाने निराश
७२. दया
७४. किंमत
७५. शपथ

### शब्दकोडे क्र. ३७ चे उत्तर

आडवे उत्तर : १.खळखळाट ४.नराधम ७.आराम १०.मळकट ११.उभार १३.साव १५.अवाजवी १६.कव १७.पाडा १९.साम २०.वरचेवर २१.रया २३.टवटवीत २६.तप २८.सान २९.बदक ३०.वरवरचे ३३.नालंदा ३५.गमक ३७.कानस ३९.गरगरणे ४२.अवहेलना ४३.रमा ४५.राजकुमार ४६.समरस ४८.वटवट ५०.रजनीनाथ ५३.समस्या ५५.नवागत ५७.अमर ५८.रानटी ६०.जवळ ६१.परवानगी ६३.कापा ६५.पातक ६८.वाटप ७०.रामायण महाभारत ७२.गर ७३.परवा ७४.रबाळ ७५.ताई ७६.रखमाई ७७.इतराजी

उभे उत्तर : १.खडसावणे २.बळ ३.तलवार ४.नरवीर ५.धमक ६.मळवट ७.आटपाटनगर ८.मग ९.करमणूक १२.भास १४.वर १५.अवयव १८.डावी २२.यातना २४.वसा २५.तबक २५अ.चाचे २७.पलंग ३०.वनराज ३१.रस ३२.रमावर ३४.दार ३६.मणेर ३८.हलकट ४०.गजर ४१.एकनाथ ४२.अमावस्या ४४.मानिनी ४५.राणी ४६.सटवाई ४७.सर ४८.वतन ४९.वन ५१.जहाज ५२.नाठाळ ५३.समर ५४.मरवा ५६.तणतण ५७.अपरंपार ५८.रागीट ५९.टीका ६२.नवार ६४.पारावार ६५.पायजामा ६६.कमळ ६७.सतरंजी ६९.पपई ७१.भाकीत ७२.गळ

# प्राचार्य मोहन फाजगे यांची सचिव पदी निवड

**कंधार-तालुका : (समर्थ गांवकरी)**



जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य मोहन फाजगे यांची नांदेड जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या सचिव पदी निवड झाल्यामुळे जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला प्राचार्य मोहन फाजगे यांनी मागील वीस वर्षापासून नांदेड जिल्हा मुख्याध्यापक संघटनेचे नेतृत्व करत ग्रामीण भागातील शिक्षणाच्या समस्या शासन दरबारी मांडण्याचे काम केलं .नांदेड जिल्हा शिक्षण मंडळावर सलग दहा वर्ष संचालक म्हणून अतिशय उत्कृष्ट असं काम केलं .तसेच नांदेड जिल्हा शिक्षण मंडळाचे कोषाध्यक्ष अध्यक्ष म्हणून पाच वर्ष आपलं काम बजावलं याची दखल घेत नांदेड जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाच्या सचिव पदी मागील पाच वर्षापासून निवड यावर्षी मुख्याध्यापक संघाची पुनर्बांधणी झाली व त्यामध्ये सुद्धा अध्यक्ष व सर्व पदाधिकाऱ्यांच्या वतीने प्राचार्य मोहन फाजगे यांची सचिव पदी फेरनिवड करण्यात आली. त्यामुळे सर्वत्र शुभेच्छा देण्यात येत आहेत जनता विद्यालयाचे संस्थापक बंन्सीधर पाटील फाजगे सचिव नितीन पाटील फाजगे, सुरेश पाटील फाजगे, दगड सांगवीचे सरपंच प्रदीप पाटील फाजगे., सेवानिवृत्त पोलीस पाटील शिवाजीराव पाटील फाजगे यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच जनता माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे सर्व कर्मचारी यांच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. व पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या याप्रसंगी जेष्ठ शिक्षक आर.जी. डुकरे सर , रामनबैनवाडसर ,इंगळे यु .जी सूर्यवंशी आर जी , सहशिक्षक आडकुटे एस. एन .,शिंदे आर .डी .खांडेकर एम. व्ही .,श्रीराम फाजगे सर उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राध्यापक राजू पाटील प्राध्यापक कांबळे ,सोनटक्के, सर शिक्षकेत्तर कर्मचारी मोर तळे सर, शंकर व सुनित उपस्थित होते.



जुन्नर तालुका : ग्रामविकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयात भारताचे पहिले पंतप्रधान आणि नवभारताचे निर्माते स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती बाल दिन म्हणून अतिशय उत्साहात संपन्न झाल्याची माहिती मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली. यावेळी विद्यालयाचे इंग्रजी विषयाचे शिक्षक दिनेश ताठे यांनी स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनपटाबद्दल आणि बालदिना बद्दल सविस्तर माहिती दिली.सोहम महाकाळ, स्वानंद साठे,मंजिरी मुरादे ,शरण्या नलावडे,अनुप्रिया डुंबरे या विद्यार्थ्यांनीही आपली मनोगते व्यक्त केली.

## थोडक्यात बातम्या...

### दै. 'समर्थ गांवकरी' दिवाळी अंकाचे आ. अमोल खताळ यांच्या शुभहस्ते प्रकाशन!



**संगमनेर (स. गांवकरी) :** संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय कार्यसम्राट आमदार अमोलजी खताळ यांच्या शुभहस्ते दैनिक समर्थ गांवकरी या दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी नामवंत उद्योजक राहुल पाबळकर यांनी दिवाळी अंकासाठी आपला मोलाचा सहभाग नोंदवित आमदार खताळ यांना प्रतीकात्मक म्हणून घड्याळ भेट देत सन्मान केला. दिवाळी अंकाच्या प्रकाशनानंतर बोलताना आमदार अमोलजी खताळ म्हणाले की, "ग्रामीण भागातील प्रश्नांना लेखणीच्या माध्यमातून न्याय देण्याचे काम समर्थ गांवकरी सातत्याने करत आहे. समाज जागृतीसाठी असे दिवाळी अंक महत्त्वाचे ठरतात." यावेळी उद्योजक राहुल पाबळकर यांनी संपादकांचे अभिनंदन करत, स्थानिक पत्रकारितेला पाठिंबा देण्याची बांधिलकी व्यक्त केली. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, गावकरी व वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिवाळी अंकाचे प्रकाशन सोहळा उत्साहात आणि पारंपरिक स्नेहभावात पार पडताच उपस्थितांनी संपादक आणि टीमचे कौतुक केले.

### वडगाव कांदळी येथे १३ वर्षीय पीडित मुलीला अज्ञात व्यक्तीने नेले पळवून

**खोडद (स. गांवकरी) :** वडगाव कांदळी (ता. जुन्नर) येथील विद्या प्रल्हाद धुळे (वय 13 वर्ष ) या मुलीला भोरवाडी येथून 5 सप्टेंबर रोजी रात्री 10.30 वाजण्याच्या व 6 सप्टेंबर रोजी पहाटे 4 च्या दरम्यान एका अज्ञात व्यक्तीने कशाचे तरी आमिष दाखवून फूस लावून पळून नेले आहे. या पीडित मुलीचा रंग काळा सावळा असून नाक सरळ, उंची 5 फूट, पिवळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस, पायात गुलाबी रंगाची चप्पल, भाषा मराठी व हिंदी बोलते असे तिचे वर्णन आहे.याची फिर्याद सौ. अनिता प्रल्हाद धुळे (पीडित मुलीची आई वय 37 वर्ष ) यांनी नारायणगाव पोलीस स्टेशन येथे दिली आहे.तरी वरील वर्णनाची मुलगी आपणास कुठे दिसल्यास अथवा तीच्या बद्दल काही माहिती मिळाल्यास तात्काळ नारायणगाव पोलीस स्टेशन येथे कळवावे, असे आवाहन नारायणगाव पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार पी. डी. मोहरे यांनी केले आहे.



### जुन्या पिढीतील पार्वता शंकर डोके यांचे निधन

**शिवनेरी (स. गांवकरी) :** कुमशेत येथील जुन्या पिढीतील पार्वता शंकर डोके वय ८० वर्ष यांचे वृद्धापकाळाने निधन झाले आहे . यांच्या पाठीमागे मुलगी , मुलगा , सुन , नातवंडे , चुलते, पतवंडे असा मोठा परिवार आहे. गावातील जुन्या पिढीतील डोके काकु असल्यामुळे सर्वांना दुःख झाले आहे.

### नारायणगांव कोल्हेमळा तीर्थक्षेत्र ओझर मार्गावरील रस्ता रुंदीकरणची मागणी

**शिवनेरी (स. गांवकरी) :** जुन्नर तालुका पर्यटन क्षेत्र जाहीर झाल्यानंतर नारायणगांव -- कोल्हेमळा -- तीर्थक्षेत्र ओझर मार्गावरील रस्ता रुंदीकरणची मागणी नागरिकांकडून सातत्याने होत आहे.अशी चर्चा तालुक्यात सुरू आहे . याबाबत खासदार डॉ. अमोल कोल्हे , आमदार शरद सोनवणे , माजी आमदार अतुल बेनके व जिल्हा परिषद सदस्य आशा बुचके यासाठी काय निर्णय घेतात ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे . या कोल्हे मळा मार्गावरील रस्त्यावरून अष्टविनायकापैकी दोन महत्त्वाचे तीर्थक्षेत्र ओझर , तीर्थक्षेत्र लेण्याद्री , शिवनेरी किल्ला , हडसर किल्ला , दार्या घाट, श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना व इतर तीर्थक्षेत्र या ठिकाणी जाण्यासाठी मोठ्या प्रमाणात गाड्यांची ये -- जा सातत्याने सुरू आहे . पुणे -- नगर -- तीर्थक्षेत्र आळंदी , तीर्थक्षेत्र पंढरपूर -- मुंबई व इतर ठिकाणी जाण्यासाठी येथील रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात गाड्यांची ये - जा सातत्याने सुरू आहे . स्थानिक येथील दूध उत्पादक , शेतकरी बांधव ,विद्यार्थ्यांना , ज्येष्ठ नागरिकांना , महिला वर्ग , आजारी रुग्णांना येथील वाहनांची लांबच लांब रांगा व गर्दी चा दररोज सामना करावा लागत आहे . या मार्गावर गाड्यांची चाक पंचर होणे , गाड्यांना तांत्रिक बिघाड झाल्यामुळे नागरिकांना सातत्याने त्रास सुरू आहे.

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाभुळवंडी**
ता. अकोले जि. अहिल्यानगर

**✻जाहीर लिलाव✻**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाभुळवंडी ता. अकोले जि. अहिल्यानगर येथील मोडकळीस आलेली वर्ग खोली १ दगड, कौले, खिडक्या, दरवाजा, लोखंडी गलडर यांचा जाहिर लिलाव दि १९/११/२०२५ रोजी सकाळी ११ वा. जिल्हा परिषद पाभुळवंडी ता अकोले जि अहिल्यानगर येथे करण्यात येणार आहे. तरी लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी वेळेवर उपस्थित राहावे. लिलावाच्या अटी व शर्ती शाळेच्या कार्यालयात लिलावाच्या वेळी पहावयास मिळतील, लिलावाचा अंतिम निर्णय शाळा व्यवस्थापन समिती जि. प. शाळा पाभुळवंडी ता. अकोले आणि पंच कमिटी यांचा असेल. लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी अनामत रक्कम डिपॉझिट भरावी लागेल.

मुख्याध्यापक
जि. प. शाळा पाभुळवंडी
ता. अकोले जि. अहिल्यानगर

सचिव अध्यक्ष
शालेय व्यवस्थापन समिती
जि. प. शाळा पाभुळवंडी,
ता. अकोले, जि. अहिल्यानगर

# नीलम ताई गोऱ्हे व अण्णा बनसोडे यांच्या हस्ते दैनिक समर्थ गांवकरी दिवाळी अंकाचे प्रकाशन!













**पिंपरी चिंचवड : (समर्थ गांवकरी)**

पुणे-पिंपरी चिंचवड येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने आयोजित भव्य पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. पत्रकारिता, साहित्य, सामाजिक कार्य आणि लोकसंपर्क या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

या सोहळ्यात विधानसभा उपसभापती नीलम ताई गोऱ्हे व विधान परिषदेचे उपसभापती अण्णा बनसोडे यांच्या हस्ते दैनिक समर्थ गांवकरी दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले यावेळी त्यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी दिवाळी अंक, घड्याळ आणि शाल देऊन बहुमानपूर्वक सत्कार केला.

नीलम ताई गोऱ्हे यांनी 'दैनिक समर्थ गांवकरी'च्या कार्याचा गौरव व समाजाभिमुख पत्रकारितेचे केले कौतुक!

दैनिक समर्थ गांवकरी दिवाळी अंकाच्या प्रकाशनावेळी विधानसभा उपसभापती नीलम ताई गोऱ्हे यांनी वृत्तपत्राच्या कार्याचा विशेष गौरव करत मनोगत व्यक्त केले.

त्या म्हणाल्या की—"दैनिक समर्थ गांवकरी हे फक्त एक वृत्तपत्र नसून ग्रामीण जनतेचा आवाज, त्यांच्या प्रश्नांचे व्यासपीठ आणि समाजाशी नाळ जुळवणारा प्रामाणिक माध्यम आहे. समाजहिताची पत्रकारिता जपणाऱ्या या वृत्तपत्राने आपल्या सातत्यपूर्ण कार्यातून विश्वासाची परंपरा निर्माण केली आहे."

त्यांनी ग्रामीण पत्रकारितेची कठीण परिस्थिती, तिथल्या पत्रकारांना भेडसावणारी आव्हाने आणि तरीदेखील सत्य, न्याय आणि लोकहितासाठी अथकपणे काम करणाऱ्या दैनिक समर्थ गांवकरीच्या टीमचे भरभरून कौतुक केले.

नीलम ताई गोऱ्हे यांनी विशेष उल्लेख केला की— ग्रामीण भागातील शेती, पाणी, महिला सक्षमीकरण, शिक्षण व आरोग्यविषयक समस्यांना दैनिक समर्थ गांवकरी सातत्याने आवाज उठवते.

स्थानिक पातळीवर विकासातील अडथळे, नागरिकांच्या तक्रारी आणि लोकप्रतिनिधींच्या कामकाजावर प्रभावी प्रकाश टाकून वृत्तपत्राने लोकशाही मजबुतीस हातभार लावला आहे.

समाजकार्य, लोकसंपर्क आणि सकारात्मक बातम्यांना दिलेला प्राधान्यपूर्ण व सन्मानाचा वावर लोकांमध्ये विश्वास वाढवणारा आहे.

कार्यक्रमात साहित्य, कला आणि पत्रकारितेतील दिग्गजही उपस्थित होते. ज्येष्ठ गझलकार भीमराव पांचाळे, पद्मश्री पुरस्कार विजेते प्रभू हरणे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत, तसेच संघाचे ब्रँड अँबेसिडर संजय फुलसुंदर या मान्यवरांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमादरम्यान पत्रकारितेच्या सामाजिक भानाची, तसेच ग्रामीण पत्रकारितेच्या योगदानाची विशेष दखल घेण्यात आली. संघटनेतर्फे विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्याने पत्रकार आणि साहित्य क्षेत्रातील कार्यकर्त्यांमध्ये प्रेरणा, उत्साह आणि नवचैतन्य निर्माण केले.

त्यांनी सांगितले की "गावकुसाबाहेर घडणाऱ्या मोठ्या बातम्या सांगणारे अनेक आहेत, पण गावातल्या माणसाच्या आवाजाला शब्द देणारे माध्यम फार थोडे आहेत. समर्थ गांवकरी त्यात अग्रस्थानी उभे आहे."

प्रकाशनावेळी नीलम ताई गोऱ्हे यांचा सन्मान करताना संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले की—

जनसामान्यांपर्यंत पोहोचणारी आणि त्यांच्या समस्या शासनापर्यंत नेणारी पत्रकारिता हीच समर्थ गांवकरीची ओळख आहे.

नीलम ताईंनी हा सन्मान स्वीकारतानाच वृत्तपत्रातील सर्व पत्रकार, प्रतिनिधी आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक करीत म्हटले—

"ही टीम समाजासाठी जे करत आहे ते स्तुत्य आहे. मी मनापासून अभिनंदन करते."

अण्णा बनसोडे यांनी पत्रकारितेचे महत्त्व अधोरेखित केले!

दिवाळी अंक प्रकाशन सोहळ्यात बोलताना विधान परिषदेचे उपसभापती अण्णा बनसोडे यांनी समाजातील पत्रकारितेची भूमिका, तिचे वाढते महत्त्व आणि लोकशाहीच्या मजबुतीसाठी पत्रकार कसे कणा बनतात यावर प्रकाश टाकला.

ते म्हणाले—"पत्रकार हे समाजाचे दर्पण आहेत. जनतेचा आवाज सरकारपर्यंत आणि शासनाच्या योजना जनतेपर्यंत प्रामाणिकपणे पोहोचविण्याचे महान कार्य पत्रकार करतात. लोकशाही जिवंत ठेवण्याचे महत्त्वपूर्ण काम जर कोण करत असेल तर ते पत्रकार आहेत. त्यांच्या लेखणीमुळे प्रशासन सजग राहते आणि समाजाचा विकास योग्य दिशेने होतो."

अण्णा बनसोडे यांनी पुढे सांगितले की— पत्रकार समाजाच्या प्रत्येक स्तराशी जोडलेले असतात; त्यामुळे त्यांच्या वृत्तातून वास्तवाला दिशा मिळते.

अडचणी, धोके आणि प्रतिकूल परिस्थितीतही काम करणारे ग्रामीण पत्रकार हे लोकशाहीचे खरे रक्षक आहेत.

सत्य आणि पारदर्शकता जपणारी पत्रकारिता हा कोणत्याही समाजाचा आधारस्तंभ असल्याचे त्यांनी ठामपणे नमूद केले.

त्यांनी दैनिक समर्थ गांवकरीच्या कार्याचे कौतुक करत सांगितले की हे वृत्तपत्र समाजातील छोट्या-छोट्या प्रश्नांना शब्द देत असल्याने ग्रामीण भागाच्या विकासाला हातभार लागतो.

"पत्रकार समाजाला दिशा देतात आणि न्याय मिळवून देण्याची शक्ती त्यांच्या लेखणीत आहे. त्यामुळे पत्रकारांचा सन्मान करणे म्हणजे लोकशाहीचा सन्मान करणे," असेही त्यांनी स्पष्ट केले.

# जामखेड तालुक्याची क्रीडा क्षेत्रात ऊतुंग भरारी

- देश पातळीवर नाव लौकिक
- जामखेडकरांना अभिमान वाटावा अशी घटना आहे.



**जामखेड तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्री भैरवनाथ विध्यालय हळगाव येथील विद्यार्थी राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्ण पदकाचा माणकरी,राष्टीय स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व करत राष्ट्रीय स्पर्धेत धडाकेबाज कामगिरी. पानिपथ हरियाणा येथे 1 नोव्हेंबर ते 5नोव्हेंबर दरम्यान राष्ट्रीय स्पर्धा पार पडल्या या स्पर्धेत मल्लविद्या कुस्ती संकुल हळगाव येथील पैलवान सुजित संतोष करगळ हा 97 किलो वजन गटामध्ये महाराष्ट्र मध्ये सुवर्ण पदकाचा माणकारी ठरला.राष्ट्रीय स्पर्धेत 1/2 मिनटं वेळ ठेवून 4 कुस्त्या चितपटीने केल्या या स्पर्धेत सुजित करगळ याने महाराष्ट्राचे नेतृत्व करत आपल्या शाळेचे तालमीचे गावाचे नावं देश पातळी वरती पोहचवले आहे. एका शेतकरी कुटुंबातील घरात तीन पैलवान सांभाळणाऱ्या संतोष करगळ यांचा चिरंजीव सुजित याने सर्व कुस्ती विचारवंत मंडळीला विचार करण्यात भाग पाडले आहे...हळगाव सारख्या छोटाश्या गावात कुठलीही अनुकूल परिस्थिती नसताना पत्र्याच्या तालमीत मॅट व इतर सामग्री नसताना देखील सर्व गोष्टींना मात केले. आपल्या नियमित हनुमंती दंड बैठका, सपाट्या, लढत, कष्टाने व तालमितील वस्ताद यांनी सांगितलेल्या आहार पद्धतीने लाल मातिमध्ये सराव करून मजबूत बांधा तयार केला आणि शालेय कुस्ती स्पर्धेचा प्रवास आपले वस्ताद शकील भैय्या शेख यांच्या सोबत सुरु केला

प्रथम जामखेड येथे तालुका स्तरीय स्पर्धेत सुवर्ण पदक, शिर्डी कोकमठाण येथे जिल्हा स्थरीय स्पर्धेत सुवर्ण पदक, काष्टी येथे पुणे विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक,व नेवासा येथे राज्य स्थरीय स्पर्धेत महाराष्ट्रात 97 किलो वजन गटात सुवर्ण पदकाचा मानकरी ठरला यावेळी कोल्हापूर विभागचा खेळाडू अजीज सय्यद 7 गुण / पुणे विभागचा सुजित करगळ 8 गुण अशी तुल्यबल झाली या स्पर्धेतील ही कुस्ती प्रेक्षनीय व चुरशीची झाली आणि राष्ट्रीय स्पर्धेकरिता ही लढत निर्णायक ठरली यामध्ये सुजित ने 8/7 च्या कडवी झुंज देत विजयी कुस्ती केली व प्रेक्षकांची मने जिंकली. पुढील फेरीत हरियाणा पानिपथ येथे राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्रचे नेतृत्व केले. आपल्या शालेय जीवनातील पहिल्याच धडकेत देशात चौथ्या क्रमांकाची मजल मारली या यशा मागे श्री भैरवनाथ विद्यालय येथील प्राचार्य श्री शेख सादिक सर, क्रीडा शिक्षक श्री उदावंत सर मार्गदर्शन लाभले सुजित च्या या कामगिरीने परिसरात आनंदाचे वातावरण तयार झाले आहे.

सुजित च्या या कामगिरीमुळे लाल मातीच्या माध्यमातून पैलवान घडवणारे वस्ताद शकील भैय्या शेख व सुजित करगळ यांचे मुस्लिम पंच कमिटी जामखेड यांच्या वतीने भव्य नागरी सत्कार समारंभ घेण्यात आला.

# कॉसमॉस फुलांच्या सौंदर्यामागे दडलाय गुपित शत्रू

## जैवविविधतेला वाढता धोका

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

पावसाळा संपला आणि सह्याद्रीच्या डोंगर,टेकडीसह ग्रामीण अनेक भागांत सध्या पिवळ्या व नारंगी कॉसमॉस फुलांचा मनमोहक बहर दिसत आहे.छायाचित्रांसाठी पर्यटक व स्थानिक नागरिक या फुलांजवळ गर्दी करतात.सोशल मीडियावर फुलांच्या पार्श्वभूमीवर घेतलेली छायाचित्रे टाकली जातात.मात्र, दिसायला आकर्षक असलेली ही फुले प्रत्यक्षात परदेशी आक्रमन वनस्पती असून, ग्रामीण स्थानिक जैवविविधतेवर आणि पशुधनाच्या खाद्यासाठी एक गंभीर धोका निर्माण करत आहेत.ही फुले सौंदर्याच्या मागे एक गुपित शत्रू दडला आहे. कॉसमॉस ही मूळ मेक्सिकोतील वनस्पती असून ती सूर्यफूल(अ‍ॅस्टेरेसी)कुटुंबातील सदस्यआहे तिची वाढ अत्यंत झपाट्याने होते आणि वाऱ्याद्वारे किंवा इतर माध्यमांतून बियाणे सहजपणे पसरतात. त्यामुळे अल्पावधीत ती मोठ्या क्षेत्रावर फैलावते. परिणामी स्थानिक गवत,झुडपे आणि फुलझाडांना ती स्पर्धा करते आणि त्यांच्या वाढीस अडथळा निर्माण करून



त्यांचे अस्तित्व कमी करते. त्यामुळे स्थानिक जैवविविधतेचा समतोल बिघडतो आणि गुरेढोरे तसेच वन्य शाकाहारी प्राण्यांसाठी आवश्यक असणारा नैसर्गिक चारा कमी होतो.

कॉसमॉस फुले जरी दिसायला मनोहारी असली,तरी ती आपल्या पर्यावरणासाठी ही फुले जैवविविधतेसाठी हानिकारक आहेत.निसर्गाच्या सौंदर्यामागे दडलेला हा धोका आता ओळखण्याची आणि एकत्रित प्रयत्नांद्वारे तो थोपविण्याची वेळ आली आहे.त्यामुळे या वनस्पतीच्या उच्चाटनासाठी सरकारने याविषयी एक धोरण निर्माण करण्याची गरज आहे.

**- डॉ. सचिन पुणेकर, वनस्पतीतज्ज्ञ**


साधारण ३० वर्षांपूर्वी कॉसमॉसच्या तणांची वाढ कमी होती.मात्र, गेल्या काही वर्षांमध्ये बदलत्या वातावरणामुळे प्रचंड वाढ झाली आहे. यामुळे स्थानिक, दुर्मीळ आणि छोट्या वनस्पतींचा नैसर्गिक अधिवास कमी होत आहे.स्थानिक जैवविविधतेचे संरक्षण करण्यासाठी त्वरित आणि नियोजनबद्ध उपक्रम हाती घेणे आता अत्यावश्यक आहे.

**- डॉ. श्रीनाथ कवडे, वनस्पतीतज्ज्ञ**

याविषयी वनस्पतीतज्ज्ञ डॉ. सचिन पुणेकर म्हणतात की,"कॉसमॉससारख्या आक्रमक वनस्पती आपल्या हिरव्या क्षेत्रांचा ऱ्हास करत आहेत.

या झाडांची फुले येण्यापूर्वीच निर्मूलन -. करणे गरजेचे आहे, कारण त्यानंतर त्यांची बियाणे मोठ्या प्रमाणावर पसरतात.लोकसहभागाशिवाय यासमस्येवर उपाय शक्य नाही.याच पार्श्वभूमीवर डॉ.पुणेकर यांनी 'जैविक आक्रमणाविरुद्ध चळवळ '(माबीमूव्हमेंट अगेन्स बायो लॉजिकल- इन्वेंशन)' ही सार्वजनिक चळवळ सुरू केली आहे.या उपक्रमाद्वारे पर्यावरणवादी,शासकीय अधिकारी,संशोधक, शेतकरी आणि शैक्षणिक संस्था एकत्र येऊन स्थानिक जैवविविधतेचे रक्षण करण्यासा- ठी प्रयत्न करत आहेत."

# दत्ताभाऊ शेंबाळेंच्या गाठीभेटीचा श्रीगणेशा



कंधार : (समर्थ गांवकरी)

न.पा.नंतर जि. प., पं.स.च्या सार्वत्रिक निवडणुका असल्याने इच्छुक उमेदवारांनी आपापल्या सर्कल आणि गणात भेटीगाठी सुरू केल्या आहेत. याचाच भाग म्हणून दत्ताभाऊ शेंबाळेंनी यांनीही गाठीभेटीचा श्रीगणेशा केला असून जि.प.असो की पं.स.पक्ष जो आदेश देईल त्यानुसार निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. एकेकाळी शिवसेनेचे मा. आ. रोहिदास चव्हाण यांचे निष्ठावंत व अत्यंत विश्वासू समजले जाणारे जमिनीवर राहून सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे, कंधार तालुक्यातील फुलवळचे भुमिपूत्र व सामान्य शेतकरी कुटुंबातले असले तरीही स्वकर्तृत्वावर आणि मित्र परिवारांच्या बळावर भाजप किसान मोर्चाचे मा. प्रदेश सचिव दत्ताभाऊ शेंबाळे हे गेली अनेक वर्षे राजकारणातून कोणावरही आरोप न करता अलिप्त राहून पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक कार्य करतात.ते २०२४ च्या विधानसभेच्या निवडणुकीत एकनाथ दादा पवार यांच्या सोबत कोणत्याही पदाची लालसा न ठेवता परत राजकारणात सक्रिय झालेले होते. शेंबाळे हे राजकारणातून काही काळ जरी अलिप्त राहिले तरीही सतत समाज सेवेत असल्यामुळे फुलवळ सर्कलमध्ये जनसामान्यात अस्तित्व निर्माण केले. त्यांनी २०२४ च्या विधानसभेच्या निवडणुकीत उमेदवार एकनाथ दादा पवार यांना फुलवळ सर्कलमध्ये मतांचा टक्का वाढवून सर्कल मधील आपली ताकद दाखवून दिली. निवडणूक लढवण्याची इच्छा नसतानाही फुलवळ सर्कल मधील दत्ताभाऊ शेंबाळे यांना मानणा-या मतदारांनी दत्ताभाऊ शेंबाळे यांनी आगामी जिल्हा परिषदेची निवडणूक फुलवळ सर्कलमधून लढवावी अशी मागणी जोर धरल्याने दत्ताभाऊ शेंबाळेंनी फुलवळ सर्कलमधून पक्षाने आदेश दिल्यास जि.प. असो की पं.स.ती निवडणूक लढवणार असल्याचा मानस बोलून दाखवला आहे.

याच पार्श्वभूमीवर श्री संत महंत एकनाथ नामदेव महाराज यांचा १५ रोजी उमरज येथील मठात जाऊन आशीर्वाद व शुभेंच्छासह सर्कल मधील मतदारांचा आशीर्वाद घेत पुढील वाटचालीला सुरुवात केली आहे.




**कंधार :** कंधार नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष अब्दुल मन्नान चौधरी , उपनगराध्यक्ष जफरउल्ला खान , एम आय एम चे कंधार तालुकाध्यक्ष महेमुदभाई (अब्बुभाई) , सामाजिक कार्यकर्ते आयुबसाब काब्दे , युवक काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष अब्दुल अहेमद यांनी आज आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली नांदेड येथे राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला आहे.

## थोडक्यात बातम्या...

### गंगागिरी व रामगिरी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त रौप्य महोत्सव



वावी (स. गांवकरी) : गंगागिरी महाराज आणि रामगिरी महाराज यांच्या २५ व्या पुण्यतिथीनिमित्त वावी येथे रौप्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सोहळ्याची सुरुवात मंगळवारी (दि. १८) होणाऱ्या समाह ध्वजारोहण सोहळ्याने होणार आहे. ध्वजारोहण सोहळ्याला अयोध्या येथील श्रीराम मंदिराचे कोषाध्यक्ष व श्रीकृष्ण जन्मभूमी मथुराचे उपाध्यक्ष गोविंददेव गिरी महाराज प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्यासह कोपरगाव बेठ आश्रमचे रमेशगिरी महाराज, भोलेगिरी महाराज, योगानंदजी महाराज, काशिकानंदजी महाराज, डॉ. रामकृष्णदास लहवितकर महाराज यांच्या उपस्थितीत ध्वजारोहणाचा सोहळा होणार आहे. १२ ते १९ डिसेंबर या कालावधीत होणारा रौप्य महोत्सव विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. दरम्यान, महाराष्ट्रातील अनेक नामांकित कीर्तनकार आपले कीर्तन व प्रवचनाद्वारे भाविकांना आध्यात्मिक आनंद देणार आहेत. सोहळ्याच्या निमित्ताने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात आरोग्य शिबिरे, स्वच्छता अभियान, सामाजिक जन जागृती कार्यक्रम, कृषी प्रदर्शन ज्यात आधुनिक शेती तंत्रज्ञान, कृषी उपकरणे, नवकल्पना, तसेच शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन सत्रे आयोजित असणार असल्याची माहिती रामगिरी महाराज सेवा संस्थेचे अध्यक्ष पांडुरंगगिरी महाराज यांनी दिली. महाराष्ट्रभरातील सर्व भाविकांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### ठाणे महापालिका हद्दीत रेबीज पल्स लसीकरण मोहीम सुरू



ठाणे (स. गांवकरी) : केंद्र शासनाच्या “Rabies Free India” धोरणांतर्गत ठाणे महानगरपालिका हद्दीत “Rabies Free Thane” मोहीम सन 2024 पासून राबविली जात आहे. रेबीज पल्स मोहिमेसह दैनंदिन लसीकरण मोहीम आजपासून (14 नोव्हे.) महापालिका हद्दीत सुरू करण्यात आली आहे. ठाणे शहराला सन 2030 पर्यंत रेबीज नियंत्रणित क्षेत्र म्हणून घोषित करणे हा या मोहिमेचा उद्देश असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले. ठाणे महानगरपालिकेने जानेवारी-फेब्रुवारी सन 2024 व 2025 मध्ये पल्स लसीकरण मोहिम कार्यक्रमांतर्गत जानेवारी 2024 मध्ये 7,409 भटके श्वान लसीकृत करण्यात आले. तर फेब्रुवारी 2025 मध्ये 11,582 भटके श्वान लसीकृत करण्यात आले असल्याची माहिती वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद पाटील यांनी दिली. या मोहिमेत भटक्या कुत्रे व मांजरांचे अँटी-रेबीज लसीकरण करुन रेडीयम रिफलेक्टर कॉलर भटक्या श्वानांच्या गळ्यात घालण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्राणी मित्र संस्थेचे स्वयंसेवक व स्थानिक स्वयंसेवी संस्थांची (NGOs) मदत घेण्यास व सहभागी करुन कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

### साडेसोळा लाखांच्या अपहार प्रकरणी अधिक तपासाचे आदेश



अहिल्यानगर (स. गांवकरी) : महापालिकेच्या आरोग्य विभागातील साडेसोळा लाखांच्या गाजलेल्या अपहार प्रकरणी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे यांचे नाव वगळण्याचा कोतवाली पोलिसांचा अहवाल फिर्यादीच्या आक्षेपानंतर न्यायालयाने अमान्य केला आहे. या गुन्ह्यात अपूर्ण व सदोष तपास झाल्याचा फिर्यादी डॉ. सतीश राजूरकर यांचा आक्षेप मान्य करत, जिल्हा न्यायालयाने ९ फेब्रुवारी २०२६ पूर्वी अधिक तपास करून अहवाल सादर करण्याचे आदेश कोतवाली पोलिसांना दिले आहेत. आरोग्य विभागातील या अपहार प्रकरणी राष्ट्रीय आरोग्य अभियानचे शहर लेखा व्यवस्थापक विजयकुमार महादेव रणदिवे व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, कोतवाली पोलिसांनी तपासात डॉ. बोरगे यांचा सहभाग आढळला नाही व त्यांच्यावर आरोपपत्र दाखल करण्याइतपत पुरावा नाही, असा अहवाल न्यायालयात सादर केला होता. या अहवालावर फिर्यादी डॉ. राजूरकर यांनी ॲड. अभिजीत पुप्पाल यांच्यामार्फत आक्षेप घेत अधिक तपासाची मागणी केली. “डिजिटल की”, कॅश बुक, आवश्यक रजिस्टर व गुन्ह्याशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रे तपासात घेण्यात आलेली नाहीत, त्यामुळे तपास अपूर्ण व चुकीचा झाला आहे,” असा प्रबळ युक्तिवाद ॲड. पुप्पाल यांनी केला. डॉ. बोरगे यांच्या वतीने या अर्जाला विरोध करण्यात आला. तथापि, न्यायालयाने फिर्यादीचा अर्ज मंजूर करून घेत, पोलिसांना अधिक तपास करण्याचे व ९ फेब्रुवारी २०२६ पूर्वी अहवाल सादर करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत.

# पाळे बु. ग्रामपंचायतीत बिरसा मुंडा जयंती उत्साहात साजरी

- ‘समृद्ध पंचायत राज अभियान’ला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

कळवण : (समर्थ गांवकरी)




ग्रामपंचायत पाळे बु. येथे 15 नोव्हेंबर 2025 रोजी आदिवासी स्वाभिमानाचे प्रतीक, संघर्षाचे धनी व जननायक महानायक बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त गावात प्रेरणादायी वातावरण पाहायला मिळाले. बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली आणि त्यानंतर ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान’ संदर्भात नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.गावकऱ्यांना स्वच्छता, विकास, महिलांचे हक्क, मुलांच्या शिक्षणापासून ग्रामविकासाच्या सर्व अंगांवर सविस्तर माहिती देत अभियानाचा प्रभावी आढावा घेण्यात आला.

विद्यार्थ्यांची प्रभातफेरी – ग्रामविकासाचा संदेश प्रत्येक दारी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन सत्र घेण्यात आले.विद्यार्थ्यांनी ‘समृद्ध पंचायतराज’ च्या संदेशासह काढलेली प्रभात फेरी गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेणारी ठरली. मुलांनी घरातील वरिष्ठांना अभियानाची माहिती पोहोचवण्याचे नियोजनही ठरवले – “प्रत्येक घरात जागरूकता, तेव्हाच खरा विकास” हा संदेश प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न.एकल महिलांचा सन्मान – विकासासोबत संवेदनशीलतेचा स्पर्श मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांच्या संकल्पनेनुसार गावातील एकल महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला.

सदर सन्मान सोहळ्यात मान्यवर व सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती मंदाताई यांनी सह गटविकास अधिकारी मा. श्री. वंदना सोणवणे यांना शाल-श्रीफळ देऊन सत्कार केला.महिलांच्या समस्या, स्वावलंबन आणि हक्कांविषयी गावात सकारात्मक वातावरण निर्माण झाले.मान्यवरांची उपस्थिती – ग्रामविकासाला चालना या महत्त्वाच्या ग्रामसभेस तालुका स्तरावरील अधिकारी –गटविकास अधिकारी विस्तार अधिकारी यांची उपस्थिती होती. तसेच गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, गावकरी, शालेय मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावविकासासाठी ऐतिहासिक दिवस बिरसा मुंडा यांच्या प्रेरणादायी कार्याची आठवण करत, पाळे बु. गावाने विकास, जनजागृती आणि सामाजिक बांधिलकीचा एक नवीन अध्याय सुरू केला.ग्रामसभा, सन्मान सोहळा, विद्यार्थी फेरी आणि विकासमार्गदर्शन – या सर्वांनी गावात उत्साह, आत्मविश्वास आणि प्रगतीची नवी उर्जा निर्माण केली.

## संभाजी चौक भागात आठ दिवसापासुन पाणी पुरवठा बंद

नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)

नावा मनपाच्या प्रभाग क्रमांक १९ मधील सिडको परिसरातील संभाजी चौक भागासह अनेक परिसरात तांत्रिक कारणामुळे गेल्या आठ दिवसांपासून पाणीपुरवठा बंद असल्याने महिलांसह नागरीकांना पाण्या अभावी त्रस्त झाले असून मनपा प्रशासनाने केवळ एका टँकरने पाणीपुरवठा केला असुन संबंधित पाणीपुरवठा अभियंता यांनी दुर्लक्ष केल्याने नागरीकांना पाणी समस्यांना तोंड द्यावे लागत असुन तात्काळ पाणीपुरवठा सुरू न झाल्यास १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता बालाजी मंदिर कमान सिडको येथे मुख्य मार्गावर परिसरातील महिला ,नागरिक,युवक यांच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. मनपा सिडको क्षेत्रीय कार्यालय प्रभाग क्रमांक १९ मधील मुख्य मार्गावर असलेल्या जलवाहिनीतुन संभाजी चौक, जिजामाता कॉलनी, संत गाडगेबाबा महाराज नगर,वसंतराव नाईक जुनी ईमारत परिसर,व स्मशानभूमी परिसरातील अनेक भागात गेल्या आठ दिवसांपासून तांत्रिक कारणामुळे पाणीपुरवठा बंद असल्याने महिला नागरीक युवक यांच्या सह परिवारातील सदस्यांना पाण्या अभावी त्रास सहन करावा लागला.

## अकोला जिल्हा समन्वयकपदी दिलीपराव धर्माधिकारी यांची निवड

### राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उत्साहाचे वातावरण

नायगाव : (समर्थ गांवकरी)

नायगाव तालुक्यातील बरबडा येथील संप्रदकीय कुटुंबात जन्मलेल्या आलेल्या दिलीपरावजी धर्माधिकारी यांची आगामी राज्यात होणाऱ्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने संघटनात्मक स्तरावर महत्त्वाचे बदल करत प्रभावी नेतृत्वाची निवड सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस तथा माजी नांदेड जिल्हाध्यक्ष दिलीपराव उर्फ माधवराव धर्माधिकारी (बरबडेकर) यांची अकोला शहर व ग्रामीण जिल्हा समन्वयकपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी ही नियुक्ती जाहीर करताना धर्माधिकारी यांचा राजकीय अनुभव, संघटन कौशल्य, तसेच कार्यकर्त्यांमध्ये असलेला दांडगा संपर्क लक्षात घेत निर्णय घेतल्याचे सांगितले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका प्रभावीपणे लढविण्यासाठी धर्माधिकारी यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

धर्माधिकारी हे पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते असून जिल्ह्यातील विविध स्तरांवर त्यांनी राजकीय व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या निवडीचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर, शिवराज पाटील होटाळकर, यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी स्वागत केले.

यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केले की, दिलीपरावजी “धर्माधिकारी यांच्या समन्वयामुळे पक्षाचे संघटन अधिक मजबूत होईल आणि आगामी निवडणुकांमध्ये पक्षाला निश्चितच चांगले यश मिळेल.”

अकोला व ग्रामीण भागात राष्ट्रवादी काँग्रेसच्या रणनीती, प्रचार मोहीम, कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन आणि पक्षाचे कार्यक्रम यांचे नियोजन करण्याची जबाबदारी आता धर्माधिकारी यांच्या खांद्यावर आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे जिल्हा संघटनेला नवी ऊर्जा प्राप्त झाली असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## अल्पवयीन मुलीवर लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

घाबरलेल्या पीडितेने काही दिवस हा प्रकार लपवून ठेवला, परंतु अखेर तिने घडलेली सर्व हकीकत तिच्या आईला सांगितली. पीडितेच्या आई-वडिलांनी विकासकडे जाऊन जाब विचारला आणि मुलीशी लग्न करण्याची मागणी केली, असता त्याने लग्नास ठाम नकार दिला. अखेर, पीडित मुलीने कुटुंबीयांसह पोलीस ठाणे गाठून विकास जंगम याच्याविरूद्ध फिर्याद दाखल केली आहे.

लग्नाचे आमिष दाखवून एका अल्पवयीन मुलीवर (वय-१७) वारंवार अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या अत्याचारातून पीडिता गर्भवती राहिल्यानंतर, तरूणाने लग्नास नकार देत तिला जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी पीडित मुलीच्या फिर्यादीवरून तरूणावर कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विकास अनिल जंगम (रा. जंगम वस्ती, कायनेटीक चौक, अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल झालेल्या तरूणाचे नाव आहे. पीडित मुलीची विकास जंगम सोबत ओळख झाल्याने त्यांच्यात बोलणे वाढवले. यातूनच त्यांच्यात प्रेमसंबंध निर्माण झाले. सुमारे एक वर्षापूर्वी, विकासने पीडितेला मी तुझ्यासोबत लग्न करील, असे आश्वासन दिले व पीडितेसोबत शरीरसंबंधाची मागणी केली. पीडितेने सुरूवातीला नकार दिला असता, मी लग्न करणारच आहे, असे सांगून त्याने पीडितेच्या इच्छेविरूद्ध बळजबरीने शरीरसंबंध प्रस्थापित केले. यानंतर, विकासने तिच्यासोबत वेळोवेळी शरीरसंबंध ठेवले. या सततच्या अत्याचारातून पीडित मुलगी गर्भवती राहिली. तिने ही गोष्ट विकासला सांगितली असता, त्याने तिला १३ ऑक्टोबर रोजी माळीवाड्यातील एका रूग्णालयात तपासणीसाठी नेले. यावेळी डॉक्टरांनी पीडिता गर्भवती असल्याची खात्री केल्यानंतर, विकासने आपले खरे स्वरूप दाखवले. मी तुझा खर्च करतो, पण माझे नाव कोणाला सांगू नको, नाहीतर तुला जिवंत ठेवणार नाही, अशी धमकी त्याने पीडितेला दिली.

## नगराध्यक्ष पदासाठी १ तर नगरसेवक पदासाठी ८ अर्ज दाखल

कंधार : (समर्थ गांवकरी)

कंधार नगरपालिका निवडणुकीसाठी शनिवारी दि.१५ नोव्हेंबर रोजी ८ उमेदवारांनी नगरसेवक पदासाठी आपले अर्ज भरले आहे. तर नगराध्यक्ष पदासाठी ऐक उमेदवारी अर्ज आले असल्याचे माहिती दिली आहे . दि १३ व १४ , १५ रोजी , उमेदवारांनी अर्ज केला होता, एकूण नगरसेवक पदासाठी २१ असे अर्ज आले तर नगराध्यक्ष पदासाठी २ उमेदवारांनी अर्ज केल्याची माहिती दिली आहे. कंधार नगरपालिका १६ रोजी रविवार अर्ज स्वीकारल्या जाणार नाही अशी माहिती दिली आहे. अर्ज भरण्याची प्रकिया सुरू झाली आहे. १७ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. १८ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात येणार आहे. २१ नोंव्हेबर रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत आहे. २६ नोव्हेंबरला निवडणुक चिन्हांचे वाटप होणार आहे. मतदान २ डिसेंबर रोजी मतदान तर ३ डिसेबर रोजी मतमोजणी पार पडणार आहे.

# वडझिरे गावचे उच्चशिक्षित युवा नेतृत्व आकाश चौधरी यांची पंचायत समिती निवडणुकीत एन्ट्री

### पक्षाने संधी दिल्यास कान्हुर पठार गणातील प्रलंबित समस्या मार्गी लावणार – आकाश चौधरी

- आकाश चौधरी कान्हुर पठार गणातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून उमेदवारीसाठी इच्छुक

पारनेर : (समर्थ गांवकरी)



वडझिरे गावातील उच्चशिक्षित युवा नेतृत्व श्री आकाश विश्वनाथ चौधरी यांनी कान्हुर पठार पंचायत समिती गणातून निवडणुकीच्या रिंगणात उतरून राजकीय क्षेत्रात पदार्पण केले आहे. “आकाश चौधरी यांच्या आई सौ. सोनाबाई चौधरी यांनी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदावर असताना, आमदार काशीनाथ दाते सर यांच्या मार्गदर्शनात वडझिरे गावासाठी अनेक महत्त्वाच्या योजना राबवून भरीव विकास घडवून आणला आहे. निधी मिळवण्यापासून कामे पूर्णत्वास नेण्यापर्यंत, प्रत्येक प्रकल्पात पारदर्शकता व समर्पण राखत गावाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले आहेत.”

व्यवसायाने आर्किटेक्ट असलेले चौधरी हे उच्चशिक्षित असून, त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्य सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. गणातील प्रलंबित समस्या सोडवणे आणि सर्वांगीण विकास साधणे हे त्यांचे एकमेव ध्येय आहे.

आकाश चौधरी यांचा जन्म वडझिरे गावात एका सामान्य कुटुंबात झाला. त्यांनी उच्च शिक्षण घेऊन यशस्वी करिअर सुरू केले. मात्र, गावाच्या विकासाची ओढ त्यांना राजकारणाकडे वळवत आहे. “मी निवडून आलो तर रस्ते, पाणी, आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत सुविधांवर प्राधान्य देईन. गणातील शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी आणि पायाभूत सुविधांचा अभाव दूर करणे हे माझे प्राथमिक लक्ष्य असेल,” असे चौधरी यांनी सांगितले.

त्यांच्या कुटुंबाची सामाजिक कार्यातील परंपरा प्रेरणादायी आहे. चौधरी कुटुंब हे गावातील विविध उपक्रमांमध्ये सक्रिय असून सामाजिक क्षेत्रात योगदान देतात.

आकाश चौधरी हे केवळ डिझाइन करत नाहीत, तर गावाच्या आणि गणाच्या भविष्याची ब्ल्यूप्रिंट तयार करत आहेत. त्यांचे एकमेव ध्येय – प्रलंबित समस्या संपवणे, गणाचा कायापालट करणे आहे. कान्हुर पठार पंचायत समिती गणात अनेक वर्षांपासून प्रलंबित समस्या आहेत. रस्त्यांची दुरावस्था, पिण्याच्या पाण्याची टंचाई, शाळांची जीर्ण स्थिती आणि युवकांसाठी रोजगाराच्या संधींचा अभाव हे प्रमुख मुद्दे आहेत. चौधरी यांनी आपल्या प्रचारात या समस्यांवर ठोस उपाययोजना मांडल्या आहेत. व्यावसायिक अनुभवाचा उपयोग करून गणाचा नियोजित विकास करेन. स्मार्ट व्हिलेज कॉन्सेप्ट राबवून आधुनिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी म्हंटले आहे.

गावकऱ्यांमध्ये चौधरी यांच्या उमेदवारीबाबत उत्साह आहे. “आकाशसारखा उच्चशिक्षित आणि प्रामाणिक युवा नेतृत्व मिळाल्याने महिला आणि युवक वर्ग त्यांना पाठिंबा देत आहे. निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले चौधरी हे युवा पिढीला प्रेरणा देत आहेत. त्यांच्या ध्येयनिष्ठेने आणि कुटुंबाच्या सामाजिक वारशाने गणाचा विकास निश्चित होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे. ही निवडणूक कान्हुर पठारसाठी नवा अध्याय ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# मतचोरीचे मोर्चे काढणाऱ्यांना तोंड लपवायला जागा राहिली नाही

■ बिहार निवडणुकीच्या निकालानंतर विखे पाटलांचा विरोधकांवर हल्लाबोल!



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील शुक्रवारी संगमनेर तालुक्याच्या दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी विविध विकासकामांचं भूमिपूजन केलं तसेच, सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. यावेळी त्यांनी संगमनेर तालुक्यातील वनविभागाच्या निसर्ग परिचय केंद्राला भेट दिली. तिथं वन विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत बिबट्यांच्या वाढत्या समस्यांबाबतही चर्चा केली. यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी बिहार निवडणूक, शहरी भागात बिबट्यांचा वाढलेला वावर आणि आगामी नगरपालिका निवडणुका यासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली. 'काँग्रेसचं अस्तित्वच संपुष्टात' : "विरोधकांनी खोट्या नॅरेटिव्हचा प्रसार केल्यामुळे लोकसभेत यश मिळवलं आणि त्याच खोट्या नॅरेटिव्हचा आधार घेऊन मतचोरीचा मुद्दा उपस्थित करून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र, बिहारच्या जनतेनं या विरोधकांना पूर्णतः धोबीपछाड दिला आणि त्यात काँग्रेसचं अस्तित्वच संपुष्टात आलं आहे. महाराष्ट्रातही मतचोरीचे मोर्चे काढणाऱ्यांना तोंड लपवायला जागा राहिली नाही." अशा शब्दांत त्यांनी बिहारच्या निवडणूक निकालांवर प्रतिक्रिया दिली.

विखे पाटील पुढे म्हणाले की, अजून किती दिवस निवडणूक आयोगावर आरोप करणार? काँग्रेस पक्षानं आत्मपरीक्षण केलं पाहिजे. त्यांचे नेते परदेशात जाऊन आम्हाला लोकशाहीचे धडे देतात. त्यामुळे आता देशात थांबून आपल्या पक्षाची अधोगती का झाली? याचं आत्मपरीक्षण केलं पाहिजे. या निवडणुकीनंतर काही प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व देखील संपुष्टात येईल. खोट्या नॅरेटिव्हला राजकारणात आधार नाही. दोनशे पार झाले आहे, त्यामुळे विरोधकांचा 'आर-पार' कार्यक्रम झाला आहे.



आळेफाटा : बेल्हे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी तब्बल चार कोटी तीस लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन आज ग्रामपंचायतीतर्फे मोठ्या उत्साहात पार पडले. या निधीतून नवीन ग्रामपंचायत इमारत उभारणीसाठी तीन कोटी ५० लाख रुपये मंजूर झाले आहेत. त्यापैकी ८० लाख नागरी सुविधा निधीतून, ६० लाख वित्त आयोग निधीतून, तर उर्वरित रक्कम ग्रामपंचायतीकडून उभारली जाणार आहे.

## थोडक्यात बातम्या...



### पाथर्डी मुले शाळेत मतदान जनजागृती प्रतिज्ञा कार्यक्रम उत्साहात

पाथर्डी (स. गांवकरी) : लोकशाहीचा कणा असलेल्या मतदान प्रक्रियेबाबत जनजागृती घडविण्यासाठी पी. एम. श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाथर्डी मुले येथे मतदान जनजागृती प्रतिज्ञा कार्यक्रम मोठ्या उत्साहात निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी प्रसाद मते यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. या कार्यक्रमात शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी यांच्यासमोर लोकशाही मूल्यांची जाणीव आणि मतदानाचे महत्त्व पटवून देत प्रतिज्ञा घेण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे सर्व नागरिकांनी कोणत्याही दबावाशिवाय, भयाशिवाय व प्रलोभनाशिवाय मतदान करण्याचा निर्धार करणे. प्रतिज्ञेचा मजकूर पुढीलप्रमाणे होता:"आम्ही प्रतिज्ञा करतो की, आम्ही भारताचे सजग नागरिक म्हणून कोणत्याही दबावाशिवाय, जात, धर्म, वर्ग किंवा कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदान करू. आम्ही इतर नागरिकांनाही मतदानासाठी प्रेरित करू आणि देशाच्या लोकशाही बळकटीसाठी आपले योगदान देऊ." यावेळी पाथर्डी तालुक्याचे विभागीय प्रांत अधिकारी प्रसाद मते, पाथर्डी बीटचे विस्तार अधिकारी श्री.रामनाथ कराड, ज्येष्ठ पत्रकार अविनाश मंत्री, अनिल खाटेर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाथर्डी मुले व मुली, दोन्ही शाळेचे मुख्याध्यापक, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी मतदानाचे महत्त्व सांगणाऱ्या भाषणांद्वारे उपस्थितांमध्ये मतदानाविषयी जागरूकता निर्माण केली. कार्यक्रमाचे संयोजन दोन्ही शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी केले. विद्यार्थ्यांनीदेखील"मतदान करा - देश घडवा"अशा घोषणांद्वारे वातावरणात राष्ट्रप्रेमाचे चैतन्य निर्माण केले.तहसीलदार डॉ. उद्धव नाईक व नगरपरिषद सीईओ सपना वसावा यांच्या मार्गदर्शनाखाली ही मतदान जन जागृती मोहीम सुरू करण्यात आली.



### दिवा शहरातील कचरा न उचलेल्याने ठाकरे शिवसेना आक्रमक

ठाणे, दिवा (स. गांवकरी) : गेल्या आठ दिवसांपासून दिव्यातील कचरा उचलला न गेल्यामुळे आज शहरात जागोजागी दुर्गंधी, घाणीचे साचलेले ढीग, माशा-डासांचा उपद्रव या सर्व समस्यांना सामोरे जात आहे. याची संपूर्ण जबाबदारी ही ठाणे महानगरपालिकेचा निष्क्रीय आणि ढिसाळ कारभार दिसून येत आहे. दिव्याला पूर्णपणे डम्पिंग ग्राऊंड बनविण्याचे पाप सत्ताधाऱ्यांनीच केले असून त्याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे असे स्पष्ट मत ठाकरे शिवसेनेचे ॲड. रोहिदास मुंडे यांनी बोलताना सांगितले. ठाणे महानगरपालिकेतील शेकडो एकर जागा रेमंडसारख्या बिल्डरांच्या घशात घालण्यात आल्या, कळवा परिसरातील जमिनी खासगीकरणाच्या विळख्यात गेल्या, तर मुंब्रा-दिवा विभागात उपलब्ध जागेच्या अभावाचा बहाणा करीत आगरी समाजाच्या जमिनींवर बेकायदेशीरपणे डम्पिंग करण्याचा अयोग्य निर्णय सत्ताधाऱ्यांनी घेतला आहे. हे सर्व निर्णय जनतेच्या हिताच्या पूर्णतः विरोधात आहे. डायघर येथे टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याला तेथील स्थानिक नागरिकांनी विरोध केल्यानंतर ठाणे महापालिकेचा कचरा पुन्हा दिव्याजवळ डम्पिंग लादण्याचे कृत्य सुरु आहे. दिव्यात कचऱ्यामुळे झालेल्या परिस्थितीच्या निषेधार्थ दिवा शहरात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे व दिवा शहर प्रमुख सचिन पाटील यांच्या नेतृत्वाखाली ठाणे महापालिकेविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात आले. कचरा तत्काळ न उचलल्यास दिवा शहरातील कोणताही नागरिक महापालिकेला पुढील काळात कर (Tax) भरणार नाही असा इशारा अधिकाऱ्यांना देण्यात आला.


### दिव्यातील दुर्घटनाग्रस्त इमारतीची सहाय्यक आयुक्तांकडून पाहणी



ठाणे, दिवा (स. गांवकरी) : दिवा शहर पूर्व येथील सावळाराम स्मृती या तळमजला अधिक दोन या जुन्या आणि धोकादायक इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील गॅलरी चा भाग काल मध्यरात्री कोळसला होता. आज सकाळी दिवा प्रभाग समितीचे सहायक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे यांनी घटनास्थळाची पाहणी केली. यावेळी स्थानिक शिवसेना विभागप्रमुख गुरुनाथ पाटील हे उपस्थित होते. बाधित रहिवाशांची विचारपूस करून त्यांना सहकार्य करण्याचे यावेळी सहाय्यक आयुक्तांनी आश्वासन दिले. सद्यस्थितीत इमारतीचे ऑडिट करून इमारतीबद्दल निर्णय घेता येणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. शिवसेना शहरप्रमुख रमाकांत मढवी यांच्या सूचनेनुसार रहिवाशांना सर्व मदत केली जाणार असल्याचे विभागप्रमुख गुरुनाथ पाटील यांनी सांगितले.

# वृत्तपत्रांनी एकत्र येत काम करण्याची गरज : प्रतिक गंगणे

*ज्येष्ठ गझलकार भीमराव पांचाळे यांचा दै. आरंभ पर्व तथा दै. गांवकरी समूहातर्फे सत्कार*



**पिंपरी चिंचवड : (समर्थ गांवकरी)**

आजच्या माहितीच्या महास्फोटाच्या युगात वृत्तपत्रांनी एकत्र येत, परस्पर सहकार्याच्या भावनेने काम करण्याची गरज पूर्वीपेक्षा अधिक वाढली आहे. "ही त्या वृत्तपत्राची बातमी, मग आम्ही का लावू?" किंवा "त्या पेपरचे नाव उद्धृत करू नका" असे म्हणत अनेक वृत्तपत्रे एकमेकांपासून दुरावत चालली आहेत. ही मानसिकता दूर झाली नाही, तर पत्रकारितेची गुणवत्ता आणि विश्वासार्हता दोन्ही धोक्यात येऊ शकतात, असे स्पष्ट मत दै. 'आरंभ पर्व'चे व्यवस्थापकीय संपादक आणि दै. गांवकरी चे निवासी संपादक प्रतिक गंगणे यांनी व्यक्त केले.

पुणे-पिंपरी चिंचवड येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने आयोजित भव्य पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. पत्रकारिता, साहित्य, सामाजिक कार्य आणि लोकसंपर्क या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. या सोहळ्यात विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम ताई गोऱ्हे व विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या हस्ते दैनिक समर्थ गांवकरी दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले यावेळी त्यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी दिवाळी अंक, घड्याळ आणि शाल देऊन बहुमानपूर्वक सत्कार केला.

यावेळी दै. आरंभ पर्वच्या संपादिका सौ. सुरेखा मते, पत्रकार महेश वरवटे, प्रतिक गंगणे, दै. गांवकरीचे संस्थापक तथा संपादक मा. श्री. विश्वासराव आरोटे, मार्केटिंग हेड अभिषेक मरगळे उपस्थित होते.

यावेळी ज्येष्ठ गझलकार भीमराव पांचाळे म्हणाले, तरूण पत्रकारांची समाजाला गरज आहे, तरूण युवकांनी लिहित राहिले पाहिजे असे म्हणत त्यांनी सत्काराचा स्विकार केला.

कार्यक्रमात साहित्य, कला आणि पत्रकारितेतील दिग्गजही उपस्थित होते. ज्येष्ठ गझलकार भीमराव पांचाळे, पद्मश्री पुरस्कार विजेते प्रभू हरणे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत, तसेच संघाचे ब्रँड अँबेसिडर संजय फुलसुंदर या मान्यवरांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली.

**वृत्तपत्रांची स्पर्धा नव्हे, समन्वयाची गरज** : गंगणे म्हणाले, सध्या अनेक माध्यमांमध्ये अनावश्यक स्पर्धेमुळे पत्रकार एकमेकांच्या विरोधात उभे राहतात. एका वृत्तपत्राने केलेल्या बातमीचा उल्लेखही दुसरे वृत्तपत्र करत नाही. "पत्रकारांनी एकीने आणि निर्भीड वृत्तांकनाने समाजासाठी काम करणे हेच मुख्य उद्दिष्ट असायला हवे. परंतु एक वृत्तपत्र दुसऱ्याचे नावही छापत नाही, ही पत्रकारितेची शोकांतिका आहे," असा टोला त्यांनी लगावला.

**सत्य, पारदर्शकता आणि सहकार्याचे महत्त्व** : त्यांच्या म्हणण्यानुसार, कोणत्याही माध्यमाचा शत्रू दुसरे माध्यम नसते. उलट एका घटनेचा संदर्भ देताना, आधीच प्रकाशित झालेल्या बातम्यांचा उल्लेख केल्यास माहिती अधिक विश्वसनीय होते. परंतु अहंकार आणि स्पर्धा यांमुळे सत्य आणि पारदर्शकता मागे पडते.

### एकीनेच नवी पत्रकारिता उभी राहील : श्री. आरोटे

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे म्हणाले, आजच्या काळात सोशल मीडिया आणि डिजिटल न्यूजच्या वेगवान स्पर्धेत पारंपरिक वृत्तपत्रांनी एकत्र आल्याशिवाय भविष्य सुरक्षित नाही. "पत्रकारांनी एकत्र यावे, वृत्तपत्रांनी एकत्र यावे-यातूनच नवी, सशक्त आणि सामाजिक भान असलेली पत्रकारिता आकार घेऊ शकते," असे त्यांनी आवाहन केले.

### पत्रकारांनी एकत्र आल्यासच समाजहिताची पत्रकारिता

प्रतिक गंगणे यांनी पुढे सांगितले की, "पत्रकारिता ही केवळ व्यवसाय नाही, तर लोकशाहीची चौथी स्तंभ म्हणून असलेली जबाबदारी आहे. वृत्तपत्रे आणि डिजिटल माध्यमे एकमेकांसोबत काम करू लागली, तर समाजहिताची पत्रकारिता अधिक बळकट होईल." त्यांच्या मते, माहितीची देवाणघेवाण, परस्पर सहकार्य, विश्वास आणि एकमेकांच्या कार्याचा आदर - या चार गोष्टी माध्यमविश्वाला पुढे नेऊ शकतात.

# लेशपाल जवळगे यांना 'युवा प्रेरणा पुरस्कार' प्रदान

*"लेशपालसारखे कार्यकर्ते समाजासाठी दिशादर्शक" : विधानपरिषद उपसभापती नीलम गोऱ्हे*

**पिंपरी चिंचवड: (समर्थ गांवकरी)**




महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने आयोजित भव्य पुरस्कार सोहळा मोठ्या उत्साहात व दिमाखात पार पडला. पत्रकारिता, साहित्य, सामाजिक कार्य, लोकसंपर्क अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा या मंचावर सन्मान करण्यात आला. समाजजीवनाच्या उन्नतीसाठी कार्यरत असलेल्या कर्तृत्ववान व्यक्तींना राज्यस्तरीय व्यासपीठावर गौरवण्याचा उपक्रम यंदाही उत्साहात झाला. या सोहळ्यात विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम ताई गोऱ्हे व विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमस्थळी दोन्ही मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांनी पत्रकारांचे समाजातील महत्त्वाचे स्थान, साहित्यिकांचे संवेदनशील लेखन, तसेच समाजकार्य करणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाचा विशेष उल्लेख केला. सरहद संस्थेचे लेशपाल जवळगे यांना देण्यात आलेला 'युवा प्रेरणा पुरस्कार' कार्यक्रमातील आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला . सामाजिक बांधिलकी, युवकांना मार्गदर्शन, राष्ट्रभावनेची जपणूक आणि सीमावर्ती भागातील कार्यकर्त्यांशी असलेली भावनिक नाळ या सर्वांच्या आधारे लेशपाल यांची कामगिरी नेहमीच कौतुकास्पद राहिली आहे. सन्मानचिन्ह प्रदान करताना नीलम ताई गोऱ्हे यांनी जवळगे यांच्या कार्याचा विशेष उल्लेख केला. त्यांनी म्हटले की, "लेशपालसारखे कार्यकर्ते समाजासाठी दिशादर्शक आहेत. त्यांचा उत्साह, देशाबद्दलची निष्ठा आणि युवकांमध्ये सकारात्मक विचार निर्माण करण्याची क्षमता विलक्षण आहे. अशा तरुणांचे कौतुक करण्याची संधी मिळणे ही माझ्यासाठी आनंदाची बाब आहे."

गोऱ्हे यांनी लेशपालचे अनेकदा कौतुक केले असून, या पुरस्काराने त्यांच्या कार्याला योग्य तो मान मिळाल्याचे त्या म्हणाल्या.

कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा प्रशस्तिपत्र, स्मृतिचिन्ह व स्तुतिसुमने देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी पत्रकार संघाच्या उपक्रमाचे कौतुक केले. समाजातील सकारात्मक बदलाला चालना देण्याच्या दृष्टिकोनातून अशा पुरस्कार सोहळ्यांची गरज असल्याचे प्रतिपादन करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान सांस्कृतिक सादरीकरणे, प्रेरणादायी भाषणे आणि विविध मान्यवरांशी संवाद यामुळे वातावरण उत्साहपूर्ण झाले. शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानत सोहळ्याची सांगता करण्यात आली.

# मंचर नगरपंचायतीत तिरंगी लढत?



■ इच्छुकांची संख्या वाढली मात्र, अर्ज दाखल नाही

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

नव्याने स्थापन झालेल्या मंचर नगरपंचायतीच्या पहिल्याच निवडणुकीत महायुतीतील पक्षांमध्ये मतभेद उफाळून आल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) व भाजप यांच्यात युतीची शक्यता चर्चेत होती. मात्र भाजपने जिल्हा स्तरावर स्वबळाचा नारा दिल्यानंतर मंचरमध्ये युती होणार की नाही याची चर्चा आहे. काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिवसेना (एकनाथ शिंदे गट) हे तिन्ही पक्ष स्वतंत्रपणे मैदानात उतरण्याची शक्यता दिसत आहे.

शक्ती मंचरमध्ये मात्र तुटल्याचे चित्र दिसत असून, नगरपंचायतीत तिरंगी लढत होण्याचे दाट संकेत मिळत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसने नगराध्यक्ष व नगरसेवक पदांसाठी इच्छुकांच्या मुलाखती पूर्ण केल्या

दरम्यान, निवडणुकीची रणधुमाळी सुरू असली तरी नामनिर्देशन प्रक्रियेला अद्याप गती मिळालेली नाही. सोमवार (दि. १०) पासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली असून, पाच दिवस उलटूनही एकाही उमेदवाराने अर्ज दाखल केलेला नाही, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अंजली कुलकर्णी यांनी दिली. आहेत, तर शिंदे गटाने राष्ट्रवादी काँग्रेससोबत जाणार नाही असा ठाम पवित्रा घेत स्वतंत्र रणनीती आखली आहे.

# तृप्ती देसाई यांनी महिलांसाठी राजकारणात यावे – समाजातून वाढती मागणी

### तृप्ती देसाई यांच्या भूमिकेकडे राज्याचे लक्ष

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

महिला सक्षमीकरणासाठी आक्रमक भूमिका घेत विविध आंदोलने, मोर्चे आणि सामाजिक प्रश्नांवर आवाज उठवणाऱ्या भूमाता ब्रिगेडच्या संस्थापक अध्यक्षा तृप्ती देसाई यांना राजकारणात सक्रिय सहभाग घ्यावा, अशी मागणी समाजातील विविध क्षेत्रांतून वाढत आहे. महिलांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात लढा देताना त्यांनी दाखवलेली धडाडी, स्पष्ट भूमिका आणि निर्भीड भाष्य यामुळे राज्यातील महिलांमध्ये त्यांच्याबद्दल विशेष विश्वास निर्माण झाला आहे.

सध्या राज्यात महिलांवरील गुन्हे, महिला सुरक्षा, मुलींचं शिक्षण आणि आरक्षणाचे प्रश्न अधोरेखित होत असताना, या सर्व विषयांवर ठाम भूमिका मांडणाऱ्या नेतृत्त्वाची आवश्यकता असल्याचे मत महिला संघटना, सामाजिक कार्यकर्त्या आणि युवकांद्वारे व्यक्त केले जात आहे. तृप्ती देसाई यांनी आतापर्यंत लोकहिताच्या अनेक मुद्द्यांवर तडफदार पद्धतीने आंदोलने केली आहेत. शनि शिंगणापूर मंदिर प्रवेश आंदोलनापासून ते विविध महिला अत्याचार प्रकरणांपर्यंत त्यांनी न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले.

दरम्यान, तृप्ती देसाई यांचे अलीकडील वक्तव्ये आणि त्यांच्या उपक्रमांवरही राजकीय वर्तुळाचे लक्ष



केंद्रीत झाले आहे. त्यांनी घेतलेली निर्भीड भूमिका आता राजकीय क्षेत्रात प्रभावीपणे वापरली जाऊ शकते, असा विश्वास अनेक कार्यकर्त्यांचा आहे. महिलांनी फक्त मतदानापुरतेच नव्हे तर स्वयंपूर्णपणे राजकारणात येऊन नेतृत्व घ्यावे, यासाठीही देसाई यांनी वेळोवेळी आवाहन केले आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांतून त्यांना उमेदवारी देण्याची मागणी सुरू झाल्याची माहिती पुढे येत आहे.

### तृप्ती देसाई यांची सर्व राजकीय पक्षांच्या प्रमुखांसोबत जवळीक

- तृप्ती देसाई गेल्या काही महिन्यांत विविध राजकीय नेते, पक्षप्रमुख आणि पदाधिकाऱ्यांसोबत सातत्याने संपर्कात.
- महिला सुरक्षेचे प्रश्न, सामाजिक मुद्दे आणि आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर सर्व पक्षांशी संवाद.
- महिला सक्षमीकरणाबाबतच्या त्यांच्या भूमिकेचे कौतुक.
- प्रमुख नेत्यांकडून बैठका, चर्चा आणि धोरणात्मक प्रश्नांवर मार्गदर्शन.
- समाजातील विविध घटक, महिला संघटना आणि युवकांकडून राजकीय पातळीवर उतरावे असा दबाव.
- राज्यातील महिला नेतृत्वाच्या अभावाची भावना अधोरेखित.
- निर्भीड भूमिका, आंदोलनशैली आणि तडफदार वक्तव्यांमुळे त्यांच्याकडे सर्व पक्षांचे लक्ष.
- आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांची राजकीय भूमिका महत्त्वाची ठरणार?
- तृप्ती देसाई कोणत्या पक्षाचा मार्ग स्वीकारतील?
- स्वतंत्र महिला नेतृत्वाचा पर्यायही चर्चेत.

तर काही सामाजिक संघटनांनी त्यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र महिला मोर्चा उभा करण्याचीही तयारी दर्शवली आहे. महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व वाढले तर धोरणात्मक स्तरावर महिलांसाठी अधिक प्रभावी निर्णय घेतले जातील, असेही मत व्यक्त केले जात आहे.

तृप्ती देसाई यांनी राजकारणात प्रवेश केल्यास महिला सुरक्षेचे प्रश्न, अत्याचारग्रस्तांना न्याय, महिला सक्षमीकरणातील अडथळे, तसेच सामाजिक सुधारणांचे मुद्दे अधिक जोरकसपणे पुढे नेले जातील, असा जनतेचा विश्वास आहे. पुढील काळात त्या कोणता मार्ग स्वीकारतात, याची उत्सुकता राज्यात वाढलेली आहे.

# शिवसेनेचा महायुतीतील घटक पक्षांना 60:40 चा प्रस्ताव

■ आ. कल्याणकर आ. बोंढारकर यांची पत्रकार परिषेदेत माहिती



नांदेड: (समर्थ गांवकरी)

जिल्ह्यातील १२ नगरपरिषद व १ नगरपंचायत निवडणुकीसाठी महायुतीतील घटक पक्ष यातील भाजप व राष्ट्रवादी (अजित पवार गट) पक्षाला जिथे, नांदेड जिल्ह्यात जिथे ज्या पक्षाचा आमदार असेल तेथे ६० टक्के जागा त्या पक्षाला व उर्वरित प्रत्येकी दोन पक्षाला २० टक्के जागा इतर घटक पक्षांना मिळाव्यात, असा प्रस्ताव शिवसेना शिंदे गटाने ठेवला आहे, अशी माहिती आ. बालाजी कल्याणकर आ. आनंद बोंढारकर यांनी पत्रपरिषदेत दिली. नांदेड जिल्ह्यात एकुण १२ नगरपरिषद व एका नगरपंचायतसाठी निवडणुका होत आहेत. त्या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंद गटाचे आ. बालाजी कल्याणक्कर व आ. आनंद बोंढारकर यांनी शनिवारी पत्र परिषद घेतली. या पत्र परिषदेत बोलतांना आमदार कल्याणवकर म्हणाले की, ही कार्यकत्यांची निवडणूक आहे. सर्वच पक्षांचे कार्यकर्ते ह्या निवडणुकी साठी उत्सुक आहेत. राज्यात महायुतीचे सरकार आहे. त्याचप्रमाणे जिल्हास्तरावर सुद्धा महायुती साठी आम्ही तयार आहोत. या मध्ये स्थानिक भाजपाचे नेते खा. अशोक चव्हाण व राष्ट्रवादी (अजित पवार गटा) चे आ. चिखलीकर यांच्याशी चर्चा साठी २ बैठका झाल्या आहेत. जिल्हास्तरावर महायुती होण्यासाठी वरिष्ठ पातळीवर सुद्धा चर्चा सुरु असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. शिवसेना शिंदे गटाच्या वतीने महायुतीतील घटक पक्ष भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, जेथे ज्या पक्षाचा आमदार आहे, तेथे त्यांना ६० टक्के जागा मिळाव्यात व उर्वरित प्रत्येकी २० टक्के जागा इतर घटक पक्षांना मिळाव्यात असा प्रस्ताय महायुतीतील घटक पक्षांना पाठविला आहे. आता आम्ही त्याच्या प्रस्तावाची वाट पाहत आहोत. प्रस्ताव जर आला नाही तर आम्ही स्वतंत्र पणे निवडणुका लढवण्याची तयारी सुद्धा केली आहे, असेही ते यावेळी महणाले.

पुढे ते म्हणाले की, शिवसेना शिंदे गटाच्या वतीने ही नगरपरिषद व नगरपंचायतीसाठी उमेदवारांचे अर्ज भरण्यात आलेले आहेत. ६० टक्के जागांच्या प्रस्ताव बाबत, त्यात बदल होऊ शकतो का असे विचारले असता आ. कल्याणकर म्हणाले की, एक मेकांना संभाळुन घेऊन महायुती होणे गरजेचे आहे असे ते म्हणाले.



जुन्नर तालुका : भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस हाच "बालदिन "म्हणून साजरा करण्यात येतो.रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कुल ओतूर येथील विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रम सादर केले. या कार्यक्रमात गाणी,कविता,भाषण,खेळ स्पर्धांचा समावेश होता.सर्व विद्यार्थी मोठ्या उत्साहाने कार्यक्रमात सहभागी झाले होते.शिक्षकांनी मुलांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका प्रियांका भोर यांनी आपल्या भाषणात प्रतिपादन केले की "बालदिन "हा प्रामुख्याने विद्यार्थ्यां चा सामाजिक मानसिक व शैक्षणिक विकासासाठी महत्त्वाचा उपक्रम आहे.आशा कार्यक्रमामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढतो आणि नेतृत्व कौशल्य विकसित की होते.

## थोडक्यात बातम्या...



### विद्यार्थ्यांना कृतीयुक्त व्यवहारिक शिक्षण प्राप्त- कविताताई आव्हाड

पाथर्डी (स. गांवकरी) : विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणातून व्यवहार ज्ञान प्राप्त होणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांना विविध ज्ञानाची भूक भागवण्यासाठी विविध उपक्रम शालेय स्तरावर राबवणे ही काळाची गरज आहे यासाठी विद्यालयात बालदिनाचे औचित्य साधून आनंद बाजारचे (फूड फेस्टिवल) आयोजन केल्यामुळे विद्यार्थ्यांना कृतीयुक्त व्यावहारिक ज्ञान प्राप्त झाले, असे प्रतिपादन संस्थेच्या सदस्या कविताताई आव्हाड यांनी व्यक्त केले. पार्थ विद्या प्रसारक मंडळ संचलित श्री विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर पाथर्डी या शाळेत संस्थेचे अध्यक्ष अभय आव्हाड यांच्या संकल्पनेतून गेल्या सतरा वर्षापासून आनंदबाजार (फूड फेस्टिवल) हा उपक्रम अविरतपणे सुरू आहे.विद्यार्थ्यांना कृतीयुक्त ज्ञान प्राप्त व्हावे,विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान आकलन व्हावे. तसेच विद्यार्थ्यांना विविध वस्तूंची देवाण-घेवाण करता यावी, विद्यार्थ्यांमध्ये बोलण्याची कला विकसित व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

### आव्हाड महाविद्यालयाच्या खेळाडूंचे वेटलिफ्टींग स्पर्धेत नेत्रदीपक यश





पाथर्डी (स. गांवकरी) : मनमाड, नाशिक येथे १७ व १९ वर्ष वयोगटाच्या राज्यस्तरीय शालेय वेटलिफ्टिंग स्पर्धा नुकत्याच संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये बाबुजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंनी पुणे विभागाचे प्रतिनिधित्व करताना नेत्रदीपक यश संपादन केले. १९ वर्ष वयोगटात मुलींच्या स्पर्धेत पुनम काकडे हिने ६९ किलो वजन गटात ७५ किलो स्नॅच व ९४ किलो क्लीन अँड जर्क असे एकूण १६९ किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकावले. सानिका शिवणकर हिने ५८ किलो वजन गटात ५१ किलो स्नॅच व ६० किलो क्लीन अँड जर्क असे एकूण १११किलो वजन उचलून कांस्यपदक तर मुलांच्या स्पर्धेत बजरंग पांढरे याने ७९ किलो वजन गटात ९५ किलो स्नॅच व १२० किलो क्लीन अँड जर्क असे एकूण २१५ किलो वजन उचलून कांस्यपदक पटकावले.

# काँग्रेसच्या पराभवामागील राजकीय सामाजिक आणि संघटनात्मक कारणांचा सखोल आढावा!

(समर्थ गांवकरी)

बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएनं 243 पैकी तब्बल 202 जागांवर विजय मिळवत अभूतपूर्व यश मिळवलं आहे. दुसरीकडे, राजद–काँग्रेस महागठबंधनाला मोठा धक्का बसला. विशेषतः काँग्रेसची कामगिरी अत्यंत निराशाजनक ठरली असून पक्षाला 60 पैकी केवळ 6 जागांवर समाधान मानावं लागलं. 2020 च्या तुलनेत काँग्रेसचा मतांचा वाटा 9.6% वरून 8.71% झाला आहे. यामुळे बिहारमधील काँग्रेसची सतत सुरू असलेली अधोगती या निवडणुकीत अधिक प्रकर्षाने दिसून आली.

काँग्रेसचा ऐतिहासिक घसरता आलेख:1990 नंतर काँग्रेसचा बिहारमध्ये एकही मुख्यमंत्री नाही.

2010 : 4 जागा.
2015 : 27 जागा.
2020 : 19 जागा
2025 : फक्त 6 जागा.

एकेकाळी बिहारमध्ये ताकदीचा आधार असणारा काँग्रेस पक्ष आता जवळपास अप्रासंगिकतेकडे वाटचाल करताना दिसत आहे.

१) काँग्रेसचा सामाजिक पाया पूर्णतः कमकुवत.

बिहारचं राजकारण जातीय समीकरणांवर आधारित आहे.

पण काँग्रेसकडे कोणताच ठोस जातीय आधार उरलेला नाही.

उच्चवर्गीय मतदार काँग्रेसपासून दुरावले.

मागासवर्गीय (EBC/ OBC) समाजात काँग्रेसची पकड निर्माण झाली नाही.

दलित–महादलित समुदायांमध्ये स्वतंत्र प्रभावशाली नेतृत्व काँग्रेसकडे नाही.

सामाजिक आधारवर्गाशिवाय बिहारसारख्या राज्यात विजय मिळवणं जवळपास अशक्य असतं.



डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून

२) काँग्रेसचे मुद्दे लोकांच्या भावनांना भिडले नाहीत

एनडीएनं प्रचारात प्रभावी भावनिक नरेटिव्ह तयार केले—

हिंदुत्व, राष्ट्रवाद, 'जंगलराज'चा उल्लेख, कायदा–सुव्यवस्था

हे मुद्दे जनमानसात घर करू शकले.

काँग्रेसने बेरोजगारी, सामाजिक न्याय, मोफत वीज, आरक्षण, EBC–दलित हक्क यांसारखे मुद्दे मांडले... परंतु—

त्यात भावनिक जोड नव्हती.

त्यांचा प्रचार कमकुवत होता.

मुद्दे योग्य रीतीने लोकांपर्यंत पोहोचलेच नाहीत.

लोक भावनिकतेला जास्त प्रतिसाद देतात—ही बाब काँग्रेसच्या प्रचारात पूर्णपणे दुर्लक्षित राहिली.

३) नरेटिव्हमध्ये मोठं अपयश — 'मत चोरी'चा मुद्दा उलटला.

काँग्रेसने प्रचारकाळात 'मत चोरी', ईव्हीएम संशय, आयोगाचं पक्षपातीपण यांच्यावर जास्त भर दिला.परंतु—

मतदारांना हा मुद्दा गंभीर वाटला नाही.

लोकांच्या दैनंदिन समस्यांना थेट जोड असलेले मुद्दे बाजूला पडले.

जनतेला 'विकास–सुरक्षा' हे प्रश्न अधिक महत्त्वाचे होते.

निवडणूक आयोगावर आरोप केल्याने सकारात्मक प्रचार मागे पडला.

याउलट एनडीएचा 'जंगलराज परत येऊ देणार नाही' हा संदेश अधिक प्रभावी ठरला.

४) महागठबंधनात समन्वयाचा पूर्ण अभाव.

काँग्रेस-राजद महागठबंधनात निवडणुकीच्या सुरुवातीपासूनच मतभेद होते.

जागावाटपात नाराजी.

उमेदवार निवडीवरून संघर्ष.

संयुक्त प्रचार अत्यंत मर्यादित.

स्थानिक नेतृत्वात विसंवाद.

रणनीती एकसंध न राहणे.

महागठबंधन कागदोपत्री एकत्र असले तरी जमिनीवर दोन वेगळ्या पद्धतीने काम करत असल्याचं दिसून आलं.

५) काँग्रेसची संघटनात्मक अवस्था अत्यंत कमजोर.

बिहारमध्ये काँग्रेसकडे— सक्रिय कार्यकर्त्यांची फौज नाही.

बूथस्तरावर संघटन नाही.

गाव, पंचायत, जिल्हा स्तरावर स्थानिक नेतृत्व नाही.

युवक, महिला, विद्यार्थी संघटना निष्क्रिय.

यामुळे पक्ष जमिनीवर स्पर्धेतच ठरला नाही.

उमेदवार निवडीतही अनेक गंभीर चुका झाल्या—

स्थानिक पातळीवर नापसंत उमेदवार.

समाजाशी कमी संपर्क असणारे नेते.

राजदच्या प्रभाव असलेल्या भागांत काँग्रेसचे उमेदवार दुर्बल.

कमजोर संघटना + अयोग्य उमेदवार = निश्चित पराभव

काँग्रेसची प्रतिक्रिया : पराभवासाठी ईव्हीएमला जबाबदार धरण्याचा प्रयत्न.

पराभवानंतर काँग्रेसमधील काही नेत्यांनी—

ईव्हीएमवर प्रश्न.

आयोगावर आरोप.

रॅलीतील गर्दीला विजयाचे सूचक मानणे.

असे विधान केले.

परंतु वास्तव वेगळंच आहे.

ईव्हीएमपेक्षा काँग्रेसच्या यंत्रणेतील कमतरता, रणनीतीचा अभाव, कमकुवत सामाजिक पाया आणि अप्रभावी प्रचार हीच पराभवाची खरी कारणं आहेत.

काँग्रेस पुढे काय? — पुन्हा उभं राहण्यासाठीचा मार्ग!

बिहारमध्ये पुन्हा अस्तित्व मिळवण्यासाठी काँग्रेसला खालील गोष्टी तातडीने कराव्या लागतील:

१) नवा सामाजिक आधारवर्ग उभारणे.

EBC, दलित, महादलित, युवा, महिला मतदारांमध्ये स्पष्ट मतदार वर्ग तयार करणे.

२) संघटना पुन्हा बांधणी.

गाव–बूथ स्तरावर सक्रिय कार्यकर्ते, नेतृत्व आणि जनसंपर्क वाढवणे.

३) भावनिक आणि प्रभावी नरेटिव्ह तयार करणे.

जनतेच्या भावनांना भिडतील असे मुद्दे समोर आणणे.

४) आघाडीत निर्णायक आणि ठोस भूमिका.

महागठबंधनात फक्त जागांच्या आकड्यांपुरते नव्हे तर रणनीतीतही प्रभावी सहभाग आवश्यक.

एनडीएचा विजय जितका प्रचंड, तितकाच काँग्रेसचा पराभवही विविध अंगांनी गंभीर आहे.

हा पराभव स्वीकारून सुधारणा करण्याची तयारी काँग्रेसनं दाखवली तरच पुढील निवडणुकांत काहीतरी बदल घडू शकतो.

काँग्रेससाठी ही निवडणूक एक मोठं पुनर्मंथनाचे निमित्त आहे.

# धरती आबाच्या जयंतीनिमित्त : उलगुलानाचा नायक बिरसा मुंडा - एक क्रांतिकारी अध्याय!



(समर्थ गांवकरी)

15 नोव्हेंबर — महान क्रांतिकारी, आदिवासी हक्कांचे प्रणेते आणि छोटानागपूर प्रदेशाच्या सामाजिक-राजकीय इतिहासाला वळण लावणाऱ्या धरती आबा बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त, आज पुन्हा एकदा त्यांच्या बलिदानाची, संघर्षाची आणि अढळ धैर्याची आठवण नव्या पिढीसमोर जागी होते. ब्रिटिश अत्याचारांनी त्रस्त असलेल्या आदिवासी समाजाला संघटित करून उलगुलान (महाबीजन) घडवून आणणारे बिरसा मुंडा हे स्वातंत्र्यपूर्व भारतातील सर्वात प्रभावी, परंतु अन्यायाने दुर्लक्षित क्रांतिकारक म्हणून ओळखले जातात.

**तुरुंगातून सुटका – पण स्वाभिमानाचा अपमान कायम!**

नोव्हेंबर 1897 चा दिवस. बिरसा मुंडांना 2 वर्षे 12 दिवसांच्या शिक्षेनंतर मुक्त करण्यात आलं. त्यांच्या सोबत डोंका आणि माझिया मुंडा या साथीदारांचीही सुटका झाली.

तुरुंगाच्या गेटवर पोहोचल्यावर मात्र त्यांना धक्का बसला. त्यांची चप्पल आणि पगडी — म्हणजेच आदिवासी अस्मितेचे प्रतीक — इंग्रज अधिकाऱ्यांनी परत देण्यास नकार दिला.

तुरुंगाधिकारी यांनी सांगितले — "फक्त ब्राह्मण, जमीनदार आणि सावकारांसाठीच चप्पल–पगडीची मुभा आहे. आयुक्त फोर्ब्स यांनी आदेश दिले आहेत."

बिरसांनी हा अपमान शांततेत सहन केला, पण मनात क्रांतीचा ज्वालामुखी धगधगत होता. तुरुंगाबाहेर पडताच 25 आदिवासी त्यांच्या स्वागतासाठी जमले. घोषणांनी वातावरण दणाणून गेलं —

"बिरसा भगवान की जय!"

त्यावर ते शांतपणे म्हणाले —

"मी देव नाही. आपण सर्वजण या लढ्यात समान आहोत."

याच क्षणी त्यांच्या अनुयायांनी त्यांना दिलं ते अमर नाव —

"धरती आबा" — भूमिपुत्रांचा रक्षक.

किरकोळ अंगकाठी; पण हिमालयाइतकी इच्छाशक्ती!

15 नोव्हेंबर 1875 रोजी जन्मलेले बिरसा दिसायला अगदी साधे —

उंची : 5 फूट 4 इंच

शरीरयष्टी : बारीक

पण डोळ्यांत तेज : असामान्य.

शिकारी, शेती आणि मेंढपाळ म्हणून सुरुवात केलेल्या या तरुणाने 25 वर्षेही पूर्ण केली नव्हती, तेव्हा त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध भीषण उठाव उभारला.

बिरसा मुंडा जयंती विशेष!

डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून

जॉन हॉफमन यांनी त्यांच्या 'एनसायक्लोपीडिया मंडारिका' मध्ये लिहिले — "त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळं तेज होतं. विचार करण्याची आणि लोकांना प्रेरित करण्याची विलक्षण क्षमता होती."

ख्रिस्ती मिशनरी शाळेत चांगले शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी काही काळ ख्रिस्ती धर्म स्वीकारला. परंतु, मिशनऱ्यांच्या आदिवासी धर्मांतर मोहिमेचा त्यांनी कडाडून विरोध केला. एका शिक्षकाने मुंडा लोकांना अपशब्द म्हटल्यावर बिरसांनी शाळेचा बहिष्कार केला आणि त्यांच्या धाडसामुळे त्यांना शाळेतून बाहेर काढण्यात आले.

यानंतर त्यांनी स्वतःचा धर्म सुरू केला — 'बिरसैत पंथ'.

मुंडा व उराँव समाज मोठ्या प्रमाणावर त्यात सहभागी झाला. हा पंथ फक्त धार्मिक आंदोलन नव्हता, तर इंग्रजांच्या धर्मांतर धोरणाला दिलेला जोरदार प्रतिउत्तर होता.

उलगुलानची सुरुवात – "अबुआ राज एते जाना!"

1886 ते 1890 दरम्यान चाईबासा येथे राहून बिरसांनी आदिवासींची संघटना मजबूत केली.

त्यांची घोषणा होती —

"अबुआ राज एते जाना
महारानी राज टुडू जाना."

आता राणीचे राज्य संपेल; आता आमचे स्वतःचे शासन येईल. ब्रिटीशांच्या जमिनीच्या कायद्यामुळे आदिवासींच्या जमिनी सावकारांनी हिसकावून घेतल्या होत्या. जंगलातील संसाधनांवर बंदी घालण्यात आली होती.

दडपशाही असह्य झाल्यावर आदिवासींनी बिरसाच्या नेतृत्वात शस्त्र उचलले. ब्रिटिश सरकार इतके भयभीत झाले की त्यांनी बिरसांच्या अटकेसाठी 500 रुपये इनाम जाहीर केले — त्या काळात ती प्रचंड रक्कम होती.

सरदार चळवळीची प्रेरणा; बुधू भगतांची परंपरा! बिरसा यांच्या आधी 1858 मध्ये बुधू भगत यांनी सरदार चळवळ उभी केली. "अबुआ दिसोम रे, अबुआ राज" हाक देत त्यांनी आदिवासींना संघटित केले, जमिनदारांवर हल्ले केले.

मरता मरता बुधू म्हणाले होते — "आज तुम्ही जिंकलात... पण आमचं उलगुलान एक दिवस तुमची सत्ता उखडून टाकेल."

बिरसा हेच भविष्य घेऊन उभे राहिले. डोंबारी टेकडीची रक्तरंजित लढाई!

1899–1900 मध्ये बंड पेटले.

सैन्याने रांचीजवळील डोंबारी टेकडी वेढली. आदिवासी धनुष्यबाणांनी, तलवारींनी प्रतिकार करत राहिले.

इंग्रजांनी तीन फैरी झाडल्या — पण लोकांना काहीच झालं नाही असं दिसत होतं. कारण बिरसांनी भाकीत दिलं होतं —

"त्यांच्या बंदुका लाकडात बदलतील."

शेवटी इंग्रज सैन्य डोंगर चढून आले आणि भीषण नरसंहार झाला.

इतिहासकार सांगतात —

"400 हून अधिक आदिवासी ठार. जखमींना जिवंत पुरलं गेलं." बिरसा मात्र तिथून थोडक्यात बचावले.

चक्रधरपूरजवळ अटक – 500 रुपयांचा विश्वासघात!

3 मार्च 1900.

स्थानिक सात विश्वासघातकांनी इनामासाठी बिरसाचा पत्ता लावला.

ते झोपडीत विश्रांती घेत असताना पोलिसांनी अचानक वेढा दिला.

एसपी रॉशने झोपडीचा दरवाजा बंदुकीने उघडला —

बिरसा मांडी घालून शांतपणे बसलेले दिसले.

ते उभे राहिले आणि म्हणाले —

"चला, मी तयार आहे." रांचीला पोहोचताच हजारो आदिवासी त्यांच्या दर्शनासाठी तुटून पडले.

न्यायालयात बेड्या – पण जनतेचा उद्रेक! आयुक्त फोर्ब्सने बिरसांना बेड्या घालून दाखवण्याचा आदेश दिला होता.

पण तुरुंगात झालेली अमानुष मारहाण सर्वांच्या नजरेत आली. तरी बिरसांच्या चेहऱ्यावर कणभरही वेदना दिसली नाही.

लोक घाबरण्याऐवजी आणखी भडकले. न्यायालयाबाहेर "बिरसा मुंडा की जय" चा आवाज थैमान घालू लागला. फोर्ब्सचे भयप्रद तंत्र फसले.

तुरुंगातील मृत्यू : हत्या की आजार?

बिरसांना पूर्ण एकांतवासात ठेवण्यात आलं. कोणाशी बोलण्याची परवानगी नव्हती.

अचानक 9 जून 1900 रोजी त्यांची प्रकृती खालावली —

ते तापाने फणफणत होते, घसा सुजला होता, पाणीही गिळता येत नव्हतं.

काही दिवसांत रक्ताच्या उलट्या सुरू झाल्या. सकाळी 9 वाजता बिरसांची प्राणज्योत मालवली. वय : फक्त 25 वर्षे.

पोस्टमार्टममध्ये 'कॉलरामुळे मृत्यू' असे लिहिले गेले.

पण त्यांच्या साथीदारांनी आरोप केला — "त्यांना विष देण्यात आलं होता." तुरुंग प्रशासनाने शेवटच्या क्षणीही वैद्यकीय मदत नाकारली.

शेवटची वाणी – उलगुलान अमर आहे! शेवटच्या क्षणांत बिरसा थोड्या वेळासाठी जागे झाले आणि म्हणाले —

"मी शरीरापुरता मर्यादित नाही... उलगुलान सुरूच राहील."

बिरसाच्या बलिदानाचा परिणाम – आदिवासींच्या हक्कांसाठी नवा कायदा. त्यांच्या मृत्यूने देश हादरला.

1908 मध्ये ब्रिटिशांनी छोटानागपूर टेनन्सी ॲक्ट (CNT Act) लागू केला —

या कायद्यानुसार बिगर आदिवासींना आदिवासींची जमीन खरेदी करण्यास मनाई करण्यात आली. हा कायदा आजही झारखंडचा 'जमीनसंरक्षण कवच' मानला जातो.

झारखंडची निर्मिती – बिरसाला शतशः अभिवादन! 15 नोव्हेंबर 2000 —

बिरसा यांच्या जयंतीच्या दिवशीच झारखंड राज्याची स्थापना करण्यात आली.

राजधानी रांचीमध्ये बिरसा मुंडा विमानतळ, विद्यापीठ, पुतळे, संग्रहालये उभारण्यात आली. ते आजही आदिवासी स्वाभिमानाचे प्रतीक आहेत.

बिरसा मुंडांचे वारस – नव्या पिढीसाठी संदेश!

बिरसा मुंडा हे फक्त एक क्रांतिकारक नव्हते,

ते होते —

सामाजिक सुधारक.

धार्मिक नेते.

आदिवासी हक्कांचे रक्षक.

ब्रिटिश सत्तेचे सर्वात मोठे शत्रू.

जमिनीवरील हक्कासाठी लढणारे पहिले योद्धे.

आज झारखंड, ओडिशा, मध्यप्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्रातील लाखो आदिवासी त्यांना धरती आबा मानतात.

आजच्या काळातील महत्व!

आजही या देशातील अनेक आदिवासी भागांमध्ये —

जमिनीवरील हक्कांवर संकट
जंगलातील संसाधनांवर निर्बंध
जबरदस्तीचे विस्थापन
खाणकामासाठी जमीन हस्तांतरण

असे प्रश्न गंभीर आहेत. या सगळ्यात बिरसांचे विचार अधिकच मार्गदर्शक ठरतात. बिरसा मुंडा यांनी आपले आयुष्य संपवले ते फक्त 25 व्या वर्षी. पण त्यांचा वारसा आजही जिवंत आहे —

लढ्यात, भूमीत, जंगलात, संस्कृतीत आणि प्रत्येक आदिवासीच्या स्वाभिमानात. त्यांनी दिलेला संदेश आजही काळजाला भिडणारा — "अबुआ राज — आमचंच राज्य."

# शेतीपंपासाठी दिवसा वीज पुरवठा करा

## वडगाव सावताळ चेअरमन शिवाजी रोकडे यांची मागणी

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

वडगाव सावताळ (ता. पारनेर) येथील शेतकऱ्यांनी शेतीपंपासाठी दिवसा वीज पुरवठ्याची मागणी केली आहे. सध्या परिसरात बिबट्यांचा वावर वाढल्याने रात्री शेतात पाणी भरणे धोकादायक बनले आहे. यामुळे शेतकरी भयभीत असून, त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी



वडगाव सावताळ सेवा सोसायटीचे चेअरमन शिवाजी रोकडे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी टाकळी ढोकेश्वर येथील महावितरण कार्यालयात निवेदन सादर केले.

निवेदनात म्हटले आहे की, बिबट्यांच्या हल्ल्याच्या भीतीमुळे शेतकरी रात्री शेतात जाण्यास घाबरत आहेत. त्यामुळे शेतीपंपासाठी दिवसा वीज पुरवठा उपलब्ध करून द्यावा, जेणेकरून शेतकऱ्यांना सुरक्षितपणे शेतीचे काम करता येईल. यावेळी माजी सभापती अरुणराव ठाणगे, उद्योजक भगवान वाळुंज, लहू जाधव, महादू रोकडे, संकेत झावरे, जयवंत वाळुंज, नामदेव रोकडे गुरुजी, वामन रोकडे, सागर निवडुंगे, सागर करगळ, अमोल मोरे यांच्यासह वडगाव सावताळ व परिसरातील अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

> बिबट्यांचा वावर वाढल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. रात्री शेतात जाणे धोक्याचे झाले आहे. शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी आणि त्यांच्या सुरक्षेसाठी प्रशासनाने तातडीने शेतीपंपासाठी दिवसा वीज पुरवठा सुरू करावा. आम्ही यासाठी सातत्याने पाठपुरावा करू.
> **- शिवाजी रोकडे, (चेअरमन, वडगाव सावताळ सेवा सोसायटी)**



नवीन नांदेड -बिहार विधानसभा भाजपा यशाबद्दल सिडको भाजपा मंडळ व पदाधिकारी यांच्या वतीने हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात फटाक्यांची आतिषबाजी व मिठाई वाटप दि १४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी करण्यात आला यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जयघोष करण्यात आला. बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपा पक्षाला घवघवीत यश संपादन केल्यानंतर माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण व खासदार अजितराव गोपछेडे,भाजपा महानगर अध्यक्ष माजी आमदार अमरभाऊ राजूरकर यांच्या आदेशा नुसार सिडको भाजपा माजी नगरसेवक व पदाधिकारी यांच्या वतीने हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात दि १४ नोव्हेंबर रोजी प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास उपस्थितीती मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

## थोडक्यात बातम्या...




### सिंदूर ऑपरेशनच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मेजर शेळके यांचा सन्मान

**श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) :** श्रीगोंदा तालुक्यातील लिंपणगावच्या मुंढेकरवाडी गावातील सैनिक भरत सुदाम शेळके यांना सैनिक सेवेमध्ये असताना ऑपरेशन सिंदूर मध्ये चांगली कामगिरी केल्याने त्यांना सी डी आर एस या मेडलने सन्मानित करण्यात आले होते. ते गावीआल्यानंतर श्रीगोंदा तालुका आजी-माजी सैनिक सेवा संघ व शहीद स्मारक समिती श्रीगोंदा यांच्या वतीने मुंढेकरवाडी येथील प्राथमिक शाळेवर त्यांचा सन्मान ठेवण्यात आला होता. याप्रसंगी उपस्थित जिल्हा सैनिक संघटनेचे अध्यक्ष श्री सांगळे साहेब व तालुका सैनिक संघटनेचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण व माजी सैनिक संघटनेतील सर्व पदाधिकारी मुंढेकरवाडी गावातील ग्रामस्थ व शाळेतील विद्यार्थी व शिक्षक स्टाफ उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष पत्रकार बाळासाहेब काकडे हे होते. पत्रकार काकडे यांनी त्यांच्या भाषणातून शेतकरी सैनिक व शिक्षण क्षेत्रावर चांगलेच मनोगत व्यक्त केले आहे.

### बिरसा मुंडा यांचा 'उल गुलान' क्रांतीचा मंत्र व्हावा - प्रा ईश्वर नवगिरे

**श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) :** रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा येथील संकुलातील महादजी शिंदे विद्यालयात बिरसा मुंडा यांची जयंती जनजातीय गौरव दिवस म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी विद्यालयाच्या ज्युनियर विभागाचे विभाग प्रमुख प्रा. ईश्वर नवगिरे यांनी बिरसा मुंडा यांच्या जीवन कार्याचा परिचय करून दिला. यावेळी बोलताना ते म्हणाले की बिरसा मुंडा यांनी दिलेला 'गुलगुलान' हा संपूर्ण क्रांतीचा मंत्र समाजाच्या जागृतीसाठी आहे. बिरसा मुंडा यांचा संघर्ष दिनदलित, दुबळे, गरीब, शेतकरी, कामगार आदिवासी, बहुजन यांच्यासाठी व इंग्रजांच्या गुलामीतून मुक्तीसाठी होता. यावेळी मंचावर विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ, उपप्राचार्य शहाजी एकाड, पर्यवेक्षक सुनिता काकडे, विजया शेलार,योगिता मुळे, प्रा समीर भिसे, प्रा विनोद सासवडकर, दत्तात्रय गायकवाड, भगवान बोटे उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन ग्रंथपाल धनंजय देशमुख सूत्रसंचालन सचिन झगडे तर आभार प्रदर्शन विद्यालयाचे गुणवत्ता विभाग प्रमुख सुधीर साबळे यांनी केले.

### होळकर श्रेया हिची खेलो इंडिया विद्यापीठ ज्युदो स्पर्धेसाठी निवड



**श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) :** दिनांक २५ ते २८ नोव्हेंबर २०२५ रोजी उदयपूर (राजस्थान) येथे होणाऱ्या पाचव्या खेलो इंडिया विद्यापीठ ज्युदो स्पर्धेसाठी श्रेया अनिल होळकर हिची निवड झाली. मागील वर्षी तिने भोपाळ येथे झालेल्या दक्षिण/ पच्छिम विभागीय आंतरविद्यापीठ ज्युदो स्पर्धेत ७८+ या वजन गटामध्ये ब्राँझ पदक प्राप्त केले होते. त्यामुळे तिची या खेलो इंडिया विद्यापीठ ज्युदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. श्रेयाचे वडील श्री.अनिल होळकर व आई सौ. प्रिया होळकर ह्यांनी ज्युदो सारख्या आव्हानात्मक खेळामध्ये आपल्या मुलीला खेळण्यास प्रोत्साहित करून तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून, ग्रामीण भागातील मुलींसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. तिच्या या यशाबद्दल महाविद्यालयीन विकास समितीचे चेअरमन माजी मंत्री मान.बबनराव पाचपुते, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मान.

# शिवसेना शिंदे पक्षात वसरणी येल अनेक महिलांचा पक्ष प्रवेश

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील वसरणी भागातील व परिसरातील अनेक महिलांनी आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते पक्ष प्रवेश केला यावेळी अनेक लाडक्या बहिणींना शिवसेना महिला पदाधिकारी म्हणून नियुक्ती पत्र देण्यात आले.



यावेळी शिवसेना शिंदे पक्षात लाडक्या बहिणींचा पक्ष प्रवेश म्हणजे पक्षात सामाजिक राजकारण, सामाजिक कार्य असल्याचे सांगून पक्ष हितासाठी सक्रीय राहून कार्य करावे असे आवाहन नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी वसरणी येथील आयोजित महिला पक्ष प्रवेश सोहळ्या प्रसंगी केले.

शिवसेनेचे उपमुख्यमंत्री एकनाथ भाई शिंदे यांच्या आदेशानुसार उपनेते हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली , नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर,दक्षिण

जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे,महिला संपर्क प्रमुख सौ.लक्ष्मीताई नरहिरे, यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटाचे सिडको शहरप्रमुख सुहास पाटील खराणे यांच्या वतीने दि १४ नोव्हेंबर रोजी आयोजित वसरणी येथील शंकरनगर भागातील महिलांच्या पक्षप्रवेश सोहळा नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना आ.आनंदराव पाटील बोंढारकर, दक्षिण जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, युवासेना दक्षिण जिल्हाप्रमुख बाळु पाटील मोरे,दक्षिण शहरप्रमुख तुलजेश यादव,तालुका प्रमुख उध्दव पाटील शिंदे,एसटी सेलचे जिल्हाध्यक्ष भालचंद्र मोळके,वसरणी येथील महिला कार्यकर्त्यां सौ.अन्नपुर्णा शामराव खराणे,महिला संपर्क प्रमुख सौ.लक्ष्मी नरहिरे, जिल्हाप्रमुख महिला आघाडीच्या जिल्हा प्रमुख सौ.वनमाला ताई राठोड, गिता पुरोहित, तालुका महिला प्रमुख स्नेहा ताई पाटील,उपजिल्हा प्रमुख सौ.गवळणताई येवले,शहरप्रमुख सौ.चिंचोलकर ताई यांच्या सह पदाधिकारी मान्यवर पदाधिकारी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आयोजक सुहास पाटील खराणे यांनी प्रास्ताविक मध्ये वसरणी भागातील शंकरनगर भागातील पुरग्रस्त बांधीत नागरीकांना आर्थिक मदत व परिसरातील विविध भागात रस्ते,पाणी,दिवाबत्ती यासह अनेक समस्या सोडल्या असल्याचे सांगून परिसरात अंगणवाडी तात्काळ मंजूर करून दिला असल्याचे सांगितले.

यावेळी परिसरातील महिला सौ. जोत्स्ना गणेश बटवाले ,सौ. कोमल सचिन सोगे ,सौ.रसिका ब्रम्हणवाडेकर, सौ.मनीषा भीम सोगे, सौ.संगीता मनोज रोतरे ,सौ.गीता कुरील,सौ. ज्योती गजानन शास्त्री , सौ.छायाबाई धुलदाणी,सौ. ज्योती डूबुकवाड,सौ.अश्विनी वावधने, यांच्या सह अनेक महिलांनी तर पुरुष मध्ये गजानन शास्त्री ,रमेश रोत्रे ,मुकेश ठाकूर ,रितेश जाधव,यांचा पक्ष प्रवेश झाला ,यावेळी महिला शिवसेना पदाधिकारी म्हणून दीक्षा वंजे ,कोमल सचिन सोगे, योगिता गजेंद्र ठाकूर, ज्योत्स्ना गणेश बटवाले ,सुरेखा बालाजी माने, यांना नियुक्ती पत्र देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सुत्रसंचलन सचिन खराणे,आभार प्रदर्शन भालचंद्र मोळके यांनी केले.

# ढोकरी शाळेत माजी विद्यार्थी संघाची स्थापना

**ढोकरी : (समर्थ गांवकरी)**

ज्यांना शाळेने घडवलं तेच माजी विद्यार्थी शाळेला घडवणार या राज्य सरकारच्या महत्त्वकांक्षी उपक्रमाची अंमलबजावणी राज्यातील सर्व शाळांना बंधनकारक केली याची तात्काळ अंमलबजावणी ढोकरी जिल्हा परिषद शाळेत करण्यात आली. शाळेच्या भौतिक विकासासाठी शाळेतील माजी विद्यार्थ्यांचा सहभाग लाभावा व त्यातून गुणवत्ता विकास साधावा या हेतूने राज्य सरकारने यापूर्वी मिशन आपुलकीला स्थान म्हणून माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्याची आवाहन केले आहे. त्याला प्रतिसाद देत ढोकरी जिल्हा परिषद शाळेत माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्यात आला आहे.

सेवानिवृत्त प्राचार्य श्री शांताराम प्रभू पुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ढोकरी शाळेत माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली. संघ स्थापन करण्याची ध्येय व उद्देश यांची संकल्पना याविषयी मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्षपदी सेवानिवृत्त प्राचार्य श्री शांताराम प्रभू पुंडे व उपाध्यक्षपदी श्री अशोक जयराम शेटे सर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

# माजी पंतप्रधान नेहरूंचे मोठे योगदान : प्राचार्य बाळासाहेब जठार

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

भारत देशाच्या जडणघडणीत भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जी नेहरू यांचे मोठे योगदान लाभले, त्याचबरोबर देशाची एकात्मतेचा संदेश देऊन भारत देश आज नेहरुंच्या विचारावर वाटचाल करत असल्याचे प्रतिपादन प्राचार्य बाळासाहेब जठार यांनी व्यक्त केले. लोणी व्यंकनाथ तालुका श्रीगोंदा येथील श्री व्यंकनाथ विद्यालयात भारताचे पहिले पंतप्रधान पंडितजी नेहरू यांची 136 वी जयंती निमित्त बालदिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य श्री जठार व सेवक वृंदांनी नेहरूंच्या जयंतीनिमित्त प्रतिमेला पुष्पांजली वाहिली. नेहरूंच्या जयंतीनिमित्त श्रीगोंदा तालुक्यातील सर्व शैक्षणिक




संस्था शासकीय कार्यालय निमशासकीय कार्यालयांमध्ये माजी पंतप्रधान पंडितजी नेहरूंना अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना प्राचार्य श्री जठार पुढे म्हणाले की भारत देश बलशाली शक्तिशाली व समृद्ध व्हावा, ही नेहरुंची संकल्पना होती. आज भारत देश नेहरूंच्या विचारावर वाटचाल करत आहे. भारत देशात सर्व धर्म समभाव याबरोबरच सर्व धर्मीयांनी गुण्या गोविंदाने एकत्रित विचारधारा ठेवावी ही देखील संकल्पना सर्वधर्म्यांना घालून दिली. निश्चितपणे त्यांच्या थोर विचारातूनच भारत देशाची मोठी प्रगती पहावयास मिळत आहे. नेहरू हे विद्यार्थी प्रिय पंतप्रधान म्हणून त्यांची गणना होत आहे. शालेय विद्यार्थ्यां बरोबरच तरुण पिढीने माजी पंतप्रधान पंडितजी नेहरूंचे विचार अंगीकारावेत, निश्चितपणे भारत देश आणखी बलशाली होईल असे विचार प्राचार्य जठार यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले.

दरम्यान नेहरू जयंती व बाल दिनानिमित्त विद्यालयाच्या शिक्षिका श्रीमती चव्हाण मॅडम यांनी इंग्रजी व हिंदी मधून शालेय विद्यार्थ्यांना बोधकथा सांगून मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन संदेश झेंडे यांनी केले. आभार उपशिक्षक ज्ञानदेव धायगुडे यांनी मानले.

# रवळगावात महिला सदस्याने स्वखर्चाने बसवले विद्युत ट्रान्सफॉर्मर

- ५० वर्षांचा दुर्लक्षित प्रश्न लागला मार्गी
- ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण

**कर्जत : (समर्थ गांवकरी)**

कर्जत तालुक्यातील रवळगाव येथील ग्रामपंचायत सदस्या सौ.मालनताई संतोष खेडकर यांनी रवळगावातील वायाळ वस्ती या ठिकाणचा गेल्या अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असलेला विजेचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविला आहे.



येथील असलेल्या धनगर समाज बांधवांच्या वायाळ वस्तीवर गेली अनेक वर्षांपासून सिंगल फेज विद्युत ट्रान्सफॉर्मर नसल्याने दिवसातून अवघे सात ते आठ तास शेती पंपावर वीज उपलब्ध होत होती. आणि उर्वरित वेळात या भागातील ३० कुटुंबातील ग्रामस्थांना रात्रीच्या वेळी देखील अंधारातच बसावे लागत होते, परंतु येथील ग्रामपंचायतीच्या विद्यमान सदस्या सौ.मालनताई खेडकर तसेच आमदार रोहित पवार यांचे खांदे समर्थक म्हणून ओळख असलेले त्यांचे पती संतोष खेडकर यांनी स्वखर्चाने विद्युत ट्रान्सफॉर्मर बसविल्याने येथील ग्रामस्थांचा विजेचा प्रश्न मार्गी लावल्याने येथील ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण दिसत आहे. सेवा सोसायटीचे माजी चेअरमन संतोष दादा खेडकर यांनी स्वखर्चातून राबवलेला हा उपक्रम एक समाजासाठी आदर्श असून प्रेरणादायी ठरणार आहे.

या नवीन ट्रान्सफॉर्मरचे उद्घाटन ग्रामपंचायतच्या विद्यमान सदस्य सौ.मालनताई संतोष खेडकर व येथील स्थानिक ग्रामस्थांच्या हस्ते शनिवारी दि.१५ रोजी करण्यात आले.

> गेली अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असलेला वायाळ वस्तीवरील विजेचा प्रश्न सोडवण्यासाठी अनेकदा मागणी करण्यात आली. मात्र, याकडे सर्वांनी दुर्लक्ष केले. सामाजिक बांधिलकी जपत आम्ही हा प्रश्न सोडवला. यापूर्वी देखील अनेक ठिकाणी विजेच्या संदर्भातील प्रश्न मार्गी लावण्याचे काम केले आहे.
> **- मालनताई संतोष खेडकर, ग्रा.प.सदस्य, रवळगाव**

या कार्यक्रमाकरिता माजी सरपंच रमेश खेडकर, प्रकाश वायाळ, विजय खेडकर, सुरज खेडकर, ग्रामपंचायत सदस्य दादासाहेब वायाळ, रवींद्र गोरे, सचिन वायाळ, नाना वायाळ, कैलास वायाळ, अण्णा वायाळ, परशुराम पवार, भीमराव वायाळ, विजय खेडकर, भास्कर वायाळ, काकासाहेब वायाळ, बाळासाहेब खेडकर, सौ.पूजा वायाळ, राधाबाई वायाळ, विजया वायाळ, पुष्पाताई वायाळ, जनाबाई वायाळ, शहाजी खेडकर, स्मृती वायाळ, धीरज खेडकर, भीमराव आडागळे, बापू कांबळे, सुनिल आटोळे, प्रकाश खेडकर, बापूराव वायाळ, गणेश वायाळ, विनायक वायाळ, निखिल वरवट, रामा तुपे आदीसह ग्रामस्थ महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# मुदखेड नगर पालिका निवडणूक : सर्वच पक्षांचे कार्यकर्ते सरसावले

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**

मुदखेड नगर पालिकेच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. दि.०२ डिसेंबरला मतदान होईल व ०३ डिसेंबरला निकाल जाहीर करण्यात येईल नगर अध्यक्ष पद खुला वर्ग महिलेला सुटले असल्यामुळे सर्व पक्ष्यांच्या मातब्बर कार्यकर्त्यांना आपल्या घरच्या महिलेला नगर अध्यक्ष पदी बसवण्याचे वेध लागले आहेत खा. अशोकराव चव्हाण यांचा प्रभाव असल्या मुळे भाजपकडून नगर अध्यक्ष पदाची उमेदवारी मिळावी म्हणून मोठे कार्यकर्ते प्रयत्नात आहेत. नांदेड लोकसभा मतदारसंघाचे खा रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणुकीची जोरदार तयारी केली आहे मुदखेड शहर काँग्रेस चे अध्यक्ष कैलास अण्णा गोडसे यांच्या नेतृत्वाखाली निवडणुक लढवणार आहेत. कॉग्रेस पक्षा कडूनही इच्छूकांची संख्या सुप आहे. गेल्या वेळी अनापेक्षितपणे अपक्ष नगर अध्यक्ष निवडून आल होता, तर भाजपाच्या उमेदवाराता २६०० पेक्षा जास्त मतदान पडते हैं प्रतिकूल परिस्थिती मध्ये एवढे मतदान त्या वेळी भाजपला मिळाले होते त्या मागे माजी नगर अल्तम चौधरी यांचा प्रभाव / करीमा वरदहस्त होता कारण त्यावेळी भाजप शिवसेना युती झाली नव्हती. अन्यथा प्रा. दिनेश शेटे सर नगर अध्यक्ष झाले असते. राम चौधरी यांनी राजकारणातून जवळपास निवृत्ती घेतली आहे. त्यांनी मुदखेड नगर पालिकेवर जवळपास सतरा अठरा वर्षे सत्ता राबवली होती. आता आपल्या मागच्या जनतेच्या पाठिंब्याचे गाठोडे व आशिर्वाद ते कोणाच्या पारड्यात टाकतात या कडे सर्वांचे लक्ष आहे. कारण नगर अध्यक्ष असताना जवळपास वीस बावीस वर्षे त्यांनी शहरात बरीच कामे करून लोकांचा आशिर्वाद मिळवला होता. आताही त्यांना निवडणुकीच्या मैदानात उतरावे म्हणुन आग्रह केला जात आहे. पण त्यांनी चांगल्या उमेदवाराला पाठींबा देण्याचे ठरवले आहे. त्यामुळे त्यांना भेटण्यासाठी व त्यांचे पाठबळ मिळावे म्हणून सर्वच पक्षाचे कार्यकर्ते त्यांच्या भेटीसाठी त्यांच्या शेताकडे आहेत. सुद्धा आहेत. ज्यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे असे कार्यकर्ते सुद्धा त्यांना भेटत आहेत. येथे एका दोघांचे नाव घेणे उचित त्यामध्ये भाजपचे कार्यकर्ते होणार नाही पण भाजपकडून ज्यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे ते कार्यकर्ते सुद्धा राम चौधरी यांना भेटत आहेत. कॉग्रेस पक्षाचे कार्यकर्ते सुद्धा त्यांच्या भेटीला जात आहेत. नगर अध्यक्ष पदाची उमेदवारी नाही मिळाली तर कदाचित अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याची तयारी सुद्धा काहीनी सुरू केली आहे. दोन-अडीच हजार मताची बेगमी राम चौधरी यांच्या मागे आहे. त्यांचा पाठिबा जर मिळाला तर गेल्या वेळ सारखा चमत्कार सुद्धा होऊ शकतो. त्यामुळे राम चौधरी यांच्या राजकिय भुमीकेला मुदखेड नगर पालिकेच्या निवडणुकीत अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे. तरी कोणाच्या पाठिशी उभे राम चौधरी यांनी अद्याप राहावयाचे आहे हे ठरवले नाही. पण नगर अध्यक्ष पदासाठी मुदखेड शहराच्या भविष्याचा विचार करणारा व स्वच्छ प्रतिमा असलेल्या उमेदवाराला पाठिंबा देणार निबद्धात लढवण्याच्या तयारीत असल्याचे संकेत दिले आहेत. वेळ आहेत पडली तर त्यांच्या व्यासपीठिवर जाऊन जनतेला संबोधीत करण्याची पासून फारकत घेतलेल्या राम त्यासाठी राजकारणा तयारी दाखवली आहे मग तो चौधरी यांच्या भूमिकेला व कोणत्याही पक्षाचा असो किवा अपक्ष पठिषज्ञाला महत्व प्राप्त झाले उमेदवार असला तरी चालेल अशी आहे त्यासाठी प्रमुख पक्षा सह भूमीका घेतली आहे. जात - धर्म न त्योंवे एकेकाळचे सहकारी जे की पाहता चांगल्या महिला उमेदवाराला इतर पक्षात आहेत ते त्यांना आहे. त्याच बरोबर प्रभागात सुध्दा ओत पक्षाची उमेदवारी मिळाली पाठिबा देणार आहोत हे स्पष्ट केले भेट्यासाठी त्यांच्या शेताकडे जात पक्ष / जात / धर्म न पाहता आपले तरङ्गीच त्यांचा पाठिंबा मोलाचा पाठबळ देणार असल्याचे सांगितले ठरणार आहे वेळप्रसंगी अपक्ष आहे त्यामुळे त्यांचा पाठींबा उभे राहण्याची वेळ आली तर महत्वाचा मानला जात आहे. त्यांचा भक्कम आधार मिळणार पासून काँग्रेस ची एक हाती सत्ता आपली भूमिका स्पष्ट केली नाही गेल्या वीस- बावीस वर्षा आहे अद्याप राम चौधरी यांनी न होता दुर्दशा झाली आहे. त्यामुळे देणार असल्याचे सांगितले जात शहरात आहे. पण शहराची सुधारणा पण चांगल्या उमेदवाराला पाठिबा शहरातील जनता कंटाळली / आहे एखाद्याचीआर्थिक बाजू वैतागली आहे. आपल्या शहराचा बळकट नसेल तर गरज पडल्यास कारभार चांगल्या प्रकारे चालावा आर्थिक मदत सुद्धा करण्याची अशी अपेक्षा आहे. नगर अध्यक्ष व तयारी दाखवली आहे. नगर अध्यक्ष नगर सेवक पदासाठी इच्छूकांची पदा बरोबरच नगर सेवक म्हणून प्रचंड गर्दी झाली आहे काही कार्यकर्ते सुद्धा उमेदवारांना त्यांचा पाठिबा तर स्वतः जवळ पाच पन्नास मताची उपयोगाचा ठरणार आहे. त्यामुळे पदाला गवसणी घालण्याचा प्रयत्न यांच्या भूमिकेला महत्व प्राप्त झाले बेगमी नसताना सुद्धा नगर अध्यक्ष माजी नगर अध्यक्ष राम चौधरी करत आहोत.

पण काही कार्यकर्ते आहे. कारण मुदखेड नगर गंभीर आहेत व प्रमुख पक्षाकडून पालिकेच्या निवडणुकीत त्यांची उमेदवारी मिळावी यासाठी प्रयत्न भूमिका निर्णायक ठरणार आहे करत आहेत. प्रसंगी अपक्ष म्हणून हे निश्चित आहे.